




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक १८९ * नांदेड * बुधवार, दि. १६ जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्यासह चारही अंतराळवीर पृथ्वीवर परतले

### कॅलिफोर्नियातील समुद्रात अंतराळयानाचं लँडिंग

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात १८ दिवस राहिल्यानंतर (१५ जुलै) भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्यासह चारही अंतराळवीर पृथ्वीवर सुखरुप परतले आहेत. 'क्सिओम-४' या अंतराळ मोहिमेतील सदस्य १८ दिवस आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात राहिले आहेत. त्यानंतर चारही अंतराळवीर अंतरराष्ट्रीय स्थानकामधून सोमवारी भारतीय वेळेनुसार सायंकाळी ४.५० वाजता पुन्हा पृथ्वीवर येण्यासाठी परतीच्या प्रवासाला निघाले होते.

त्यानंतर मंगळवारी शुभांशू शुक्ला यांच्यासह चारही अंतराळवीरांचं अंतराळयान कॅलिफोर्नियातील एका समुद्रात लँडिंग झालं आहे. हे चारही अंतराळवीर पृथ्वीवर सुखरुप परतले आहेत. त्यानंतर आता या अंतराळवीरांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. या सर्वांनी ही मोहीम यशस्वी पार पडल्याबद्दल आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात १८ दिवस राहिल्यानंतर मंगळवारी भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्यासह चारही अंतराळवीर पृथ्वीवर सुखरुप परतल्यानंतर त्यांचं स्वागत करण्यात येत आहे. तसेच यावेळी शुभांशू शुक्ला यांच्या आई-वडिलांना आनंद अश्रू अनावर झाल्याचंही पाहायला मिळालं.

भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला पृथ्वीवर परतल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट करत प्रतिक्रिया दिली आहे. पंतप्रधान मोदींनी म्हटलं की, ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला त्यांच्या ऐतिहासिक अंतराळ मोहिमेतून पृथ्वीवर परतत असताना त्यांचं मी स्वागत करतो. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे भारताचे पहिले अंतराळवीर म्हणून, त्यांनी



त्यांच्या समर्पण, धैर्य आणि अग्रगण्य भावनेने अब्जावधी स्वप्नांना प्रेरणा दिली. हे आपल्या अंतराळ उड्डाण मोहिमेच्या दिशेने आणखी एक मैलाचा दगड आहे.

तसेच शुभांशु शुक्ला त्यांच्या निरोपाच्या भाषणात पुढे हिंदीतून बोलताना म्हणाले की, माझा हा प्रवास कमालीचा राहिला आहे. पण आता माझा हा प्रवास संपणार आहे, पण तुमचा आणि माझा प्रवास अजून खूप दूरपर्यंत आहे. आपला ह्यूमन स्पेस मिशनचा प्रवास खूप लांबचा आणि कठीण देखील आहे. पण मी तुम्हाला खात्री देतो की आपण जर निश्चय केला तर ती शक्य आहे, असे ते म्हणाले.

## जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रारुप प्रभाग रचनेचा कार्यक्रम घोषित

### निवेदने, हरकती, सूचना २१ जुलैपर्यंत सादर करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम घोषित करण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रारुप प्रभाग रचना १४ जुलै रोजी परिशिष्ट ५ (अ) व ५ (ब) मध्ये पुढील ठिकाणी प्रसिध्द करण्यात आली आहे.




प्रारुप प्रभाग रचना जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर, जिल्हा परिषद नांदेड यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर, संबंधित तहसिल कार्यालयाच्या बोर्डावर, संबंधित पंचायत समितीच्या नोटीस बोर्डवर, जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळ https:nanded.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समित्यांच्या निर्वाचक गणाच्या प्रारुप प्रभाग रचनेस मसुद्यास कोणाची हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची सकारण लेखी निवेदने, हरकती, सूचना जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड व संबंधित तहसिल कार्यालय येथे २१ जुलैपर्यंत सादर करावेत. त्यानंतर आलेली निवेदने, हरकती, सूचना इत्यादी विचारात घेतली जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## कॅप्टन शुभांशू स्वागतम्, आम्हाला आपला अभिमान -मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)–** स्वागतम् कॅप्टन शुभांशू आपण तमाम भारतीयांचे अभिमान ठरला आहात. या यशस्वी मोहिमेसाठी आपले आणि आपल्या सहकाऱ्यांचे अभिनंदन..! अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांचे आज पृथ्वीवरील आगमनासाठी स्वागत तसेच या या यशस्वी मोहिमेसाठी अभिनंदन केले आहे.

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात पोहोचलेले पहिले भारतीय अंतराळवीर कॅप्टन शुभांशू शुक्ला आणि त्यांचे सहकारी 'क्सिओम-४' ही अंतराळ मोहीम यशस्वी करून पृथ्वीवर परतले. या यशस्वी मोहिमेमुळे भारतीयांचा अवकाश संशोधन क्षेत्रातील आत्मविश्वास दुणावला आहे. भारतीय तरुणांसाठी ही मोहीम प्रेरणादायी ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दृष्टीक्षेपातील अवकाश संशोधन क्षेत्राच्या विकासासाठी टाकले गेलेले हे महत्त्वाचे पाऊल तमाम भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. त्यासाठी कॅप्टन शुभांशू यांचे आणि त्यांच्या या साहसाला पाठबळ देणाऱ्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचेही मनापासून अभिनंदन, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

## तब्बल १२८ वर्षांनंतर क्रिकेटचं ऑलिम्पिकमध्ये कमबॅक, वेळापत्रक जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)–** क्रिकेट प्रेमींसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. २०२८ मध्ये लॉस एंजेलिसमध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये तब्बल १२८ वर्षांनंतर क्रिकेट पुन्हा एकदा दिसणार आहे. आयोजकांनी अधिकृत वेळापत्रक जाहीर केलं असून, यामध्ये पुरुष व महिला दोन्ही गटांचा समावेश आहे.

क्रिकेट स्पर्धेची सुरुवात १२ जुलै २०२८ रोजी होणार आहे. पुरुषांचा सुवर्णपदक साम ना २९ जुलैला, तर महिलांचा अंतिम सामना २० जुलैला खेळवला जाईल. ही स्पर्धा लॉस एंजेलिसपासून ५० किमी अंतरावर असलेल्या पॉमेना शहरातील फेअरग्राउंड्स स्टेडियम येथे पार पडणार आहे.



या स्पर्धेत पुरुष आणि महिला गटात प्रत्येकी ६ संघ भाग घेणार आहेत. एकूण १८० क्रिकेटपटू मैदानावर खेळतील. आयोजकांच्या माहितीनुसार दररोज २ सामने खेळवले जातील. अमेरिका, वेस्ट इंडीजसह क्रिकेटला नवा मंच मिळत असल्याने क्रिकेटला ऑलिम्पिकमध्ये स्थान देण्यात आले आहे.

भारतीय संघाचा सहभाग निश्चित होण्याची शक्यता आहे. ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने एशियन गेम्स मध्ये सुवर्णपदक जिंकलं होतं. आता सर्वांचं लक्ष भारताच्या ऑलिम्पिकमधील यशाकडे लागलं आहे. तसेच ऑस्ट्रेलिया, इंग्लंडसारखे पारंपरिक क्रिकेट राष्ट्रदेखील स्पर्धेत सहभागी होण्याची शक्यता आहे.

तुम्हाला माहिती आहे का? ऑलिंपिक मध्ये आतापर्यंत फक्त एकदाच क्रिकेटचा समावेश झाला होता, १९०० पॅरिस ऑलिंपिक मध्ये. त्यावेळी फक्त दोन संघ फ्रान्स आणि ग्रेट ब्रिटन सहभागी झाले होते. ब्रिटनने तो सामना १५८ धावांनी जिंकून सुवर्ण पदक पटकावलं होतं.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी शशिकांत शिंदे

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची चर्चा मागील काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात होती. मात्र, या चर्चा राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी फेटाळून लावल्या होत्या. यानंतर आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची मुंबईत एक महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अखेर आमदार शशिकांत शिंदे यांची नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. दरम्यान, या बैठकीला शरद पवार, जयंत पाटील, जितेंद्र



आव्हाड, शशिकांत शिंदे यांच्यासह पक्षाचे आदी नेते उपस्थित होते.

निवड झाल्यानंतर शशिकांत शिंदे म्हणाले की, मला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा प्रदेशाध्यक्ष म्हणून माझ्यावर जबाबदारी देण्यात आल्यामुळे मी सर्वांचे आभार व्यक्त करतो, असे ते म्हणाले.

## राष्ट्रवादीच्या नूतन पदाधिकाऱ्यांनी घेतली मुंबईत अजितदादांची भेट




**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नूतन पदाधिकाऱ्यांनी बुधवार, दि. १५ जुलै रोजी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात मुंबईमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची देवगिरी निवासस्थानी भेट घेऊन आभार मानले.

राष्ट्रवादीचे नेते तथा लोहा- कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष या वसंतनगर येथील निवासस्थानी दि. १३ जुलै रोजी जिल्ह्यातील नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या निवडीनंतर बुधवारी प्रथमच नवनियुक्त पदाधिकारी यांनी मुंबई येथे जाऊन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेतली.

या शिष्टमंडळामध्ये राज्यमंत्री इंद्रनील नाईक, माजी आ. मोहन हंबर्डे, माजी आमदार अविनाश घाटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस दिलीपराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष माधव पावडे, शेषेराव चव्हाण आदींची उपस्थिती होती.

यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांशी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चर्चा केली. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सर्वाधिक यश मिळवून देण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी तळमळीने कामाला लागावे. एकमेकांच्या मनात कोणत्याही शंका-कुशंका न ठेवता पक्षवाढीसाठी प्रामाणिकपणे काम करावे, निश्चितपणे आगामी काळातही अनेकांना अनेक पदांवर संधी दिली जाईल, असा विश्वासही अजितदादा पवार यांनी यावेळी दिला.

## अवघ्या २७ धावांवर वेस्ट इंडिजचा संपूर्ण संघ गारद

**मुंबई (प्रतिनिधी)–** वेस्ट इंडिज क्रिकेटच्या इतिहासातला मंगळवारचा दिवस काळा दिवस ठरला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यात संपूर्ण वेस्ट इंडिज संघ फक्त २७ धावांतच गारद झाला आणि त्यांनी टेस्ट क्रिकेटमधील १२९ वर्षांपूर्वीचा लाजिरवाणा विक्रम मोडीत काढला. ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने पहिल्याच ओव्हरम ध्ये ३ विकेट घेत वेस्ट इंडिजला हादरवून सोडलं. त्याने एकूण ६ विकेट घेतले, आणि १५व्या ओव्हरच्या तिसऱ्या चेंडूवर जेडन सील्सच्या रूपात शेवटचा विकेट मिळवत इतिहास रचला. स्टार्कला या जबरदस्त कामगिरीसाठी साम नावीर आणि मालिकावीर घोषित करण्यात आलं.

## सोलापुरात मराठा समाजाच्या बैठकीत हाणामारी

**सोलापुर (प्रतिनिधी)–** सोलापुरात मराठा समाजाच्या बैठकीत हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. हाणामारीच्या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. बैठकीतील कार्यकर्त्यांच्या हाणामारीचा व्हिडिओ समोर आला आहे. जन्मजयराजे भोसले यांच्या विरोधात वक्तव्य केल्याने हाणामारी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

अक्कलकोटध्ये शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी संभाजी ब्रिगेडच्या प्रवीण गायकवाड यांना काळं फासलं होतं. या घटनेने सोलापुरातील राजकीय वातवरण तापलं आहे. प्रवीण गायकवाड यांना काळं फासल्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आक्रमक निषेध नोंदवला आहे. या प्रकरणाचे पडसाद मराठा समाजातही उमटले आहेत. याच पार्श्वभूमीवर आयोजित केलेल्या बैठकीत राडा झाल्याची घटना घडली आहे.

प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या शाईफेक हल्ल्याच्या निषेधार्थ मंगळवारीसोलापुरात बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. याच बैठकीत हा गोंधळ निर्माण झाला. जन्मजयराजे भोसले यांच्या कार्यकर्त्याकडून एका कार्यकर्त्याला मारहाण करण्यात आली. या हाणामारीच्या घटनेनंतर दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांविरोधात घोषणाबाजी केली.









## कौस्तुभ धवसे मुख्यमंत्र्यांचे नवे मुख्य गुंतवणूक सल्लागार

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र हे देशाच्या विकासात मोठं योगदान देत देशाची आर्थिक राजधानी मुंबईत आहे. त्यामुळे, मुंबईसह महाराष्ट्रातील गुंतवणुकीकडे देशाचे लक्ष लागलेले असते. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सातत्याने महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक यावी, उद्योगधंदे वाढावेत आणि रोजगारनिर्मित्ती व्हावी यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यातच, आता मुख्यमंत्र्यांचे मुख्य गुंतवणूक सल्लागार म्हणून कौस्तुभ धवसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतचा निर्णय घेतला आहे.




जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# जनसुरक्षा कायदा : गरज, तरतुदी आणि शंका

मागील वर्षभर चर्चेत राहिलेल्या आणि वादग्रस्त ठरलेल्या जनसुरक्षा कायद्यातील तरतुदींना अखेर विधिमंडळाने मंजुरी दिली आहे. या कायद्यामुळे देशात नक्षलवाद, अतिरेकी कारवाया आणि घटनाविरोधी विचारधारेच्या संस्थांवर नियंत्रण आणण्याचा मार्ग सरकारला उपलब्ध झाला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जाहीर केले आहे की, पुढील वर्षापर्यंत देश नक्षलवादमुक्त करण्याचे उद्दिष्ट सरकारने निश्चित केले आहे. त्यासाठी केंद्रीय सुरक्षा दलांच्या माध्यमातून नक्षलवाद्यांच्या मुख्य आधारस्तंभांना हादरा देण्यात आलेला आहे. मात्र अजूनही शहरी भागात काही तथाकथित बुद्धिजीवी आणि संघटना लोकशाही संस्थांवर हल्ला करण्याचे, जनमत दिशा भ्रमित करण्याचे प्रयत्न करताना दिसतात. या पार्श्वभूमीवर जनसुरक्षा कायदा केवळ आवश्यकता नव्हे, तर एक काळाची गरज ठरतो. महाराष्ट्रासारख्या औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीच्या मार्गावर असलेल्या राज्यात अशा विध्वंसक विचारसरणीची मुळे खोलवर रुजली तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. म्हणूनच या नव्या कायद्याचे अस्तित्त्व राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे आणि धोरणात्मक ठरते. या कायद्यानुसार कुठल्याही व्यक्तीऐवजी सर्वप्रथम एखाद्या संघटनेवर बंदी घालण्यात येणार आहे. एखादी संघटना जर संविधानविरोधी कृती करत असल्याचे पुरावे हाती लागले, तर त्रिसदस्यीय सल्लागार मंडळाकडे, ज्यामध्ये न्यायाधीश आणि सरकारी वकील असतील, प्रस्ताव सादर केला जाईल. या मंडळाकडून तपासणी आणि परवानगी मिळाल्यानंतरच बंदीची अधिसूचना जारी होईल. बंदी घालण्यात आलेल्या संघटनेला ३० दिवसांच्या आत उच्च न्यायालयात अपील करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. यामधून एक महत्त्वाचा संदेश दिला गेला आहे की, सरकार एकतर्फी किंवा सूडबुद्धीने कारवाई करणार नाही. या कायद्यातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे वैयक्तिक स्वातंत्र्याची हमी. व्यक्तीच्या अटकेसाठी कोणतीही कारवाई करण्यापूर्वी, त्याच्या संघटनेवरील बंदी आणि त्याचे प्रत्यक्ष सहभागाचे, आर्थिक मदतीचे पुरावे आवश्यक ठरवले गेले आहेत. यामुळे फक्त विचार मांडल्यामुळे कोणावरही कारवाई होणार नाही, हे स्पष्ट होते. या कायद्यावर विरोधकांनी सरकारला उद्देशून आकसाच्या कारवाईचा आरोप लावला आहे. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्पष्ट केले की, या कायद्याचा वापर शेतकरी, शिक्षक, विद्यार्थी संघटना किंवा राजकीय पक्षांवर करणार नाही. त्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मूल्यांची पूर्ण जपणूक केली जाईल, असे आश्वासनही दिले आहे. अर्थात, चिंता येथेच संपत नाहीत. अभिव्यक्ती स्वातंत्र्य ही लोकशाहीची मूलभूत भूमिका आहे. ती सत्तेच्या दबावाखाली येऊ नये, ही जबाबदारी सरकारवर आहे. जनसुरक्षा कायदा हा उद्देश आणि अंमलबजावणी या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. कायद्याचा हेतू जितका योग्य, तितकीच त्याची अंमलबजावणी नितिमूल्यांवर आधारित असली पाहिजे. सुदैवाने या विधेयकात मूळ मजकुरात काही स्वागतार्ह बदल करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, व्यक्ती आणि संघटना यांच्या बेकायदेशीर कृत्यांवर प्रतिबंध या शब्दांची जागा कडव्या, डाव्या विचारसरणीच्या संघटना अशा स्वरूपात घेण्यात आली आहे. हे बदल सरकारला कोणत्याही विरोधी मताला थोपवण्याचे स्वातंत्र्य देत नाहीत, हे स्पष्ट होते. तसेच बंदी घालण्यात आलेल्या संघटनेने न्यायालयात दाद मागण्याचा मार्ग खुला ठेवण्यात आलेला आहे, ही लोकशाहीसाठी एक आश्वासक बाब आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, न्यायप्रक्रियेचा सन्मान आणि विरोधी मतांबद्दल सहिष्णुता राखली गेली पाहिजे अन्यथा, जनसुरक्षा कायदा हा सरकारविरोधी मतांना दडपण्यासाठी एक अस्त्र ठरेल, अशी भीतीही वायफळ ठरू शकणार नाही. नव्या जनसुरक्षा कायद्याची दिशा योग्य असून, त्याचा उद्देश घटनाविरोधी कारवाया रोखणे हा आहे. मात्र या कायद्याचा वापर करताना सरकारला अत्यंत संयम, पारदर्शकता आणि लोकशाही मूल्यांची जपणूक करण्याची गरज आहे. फक्त कायदे बनवून नव्हे, तर त्यांची नीतिमूल्यांवर आधारित अंमलबजावणी करूनच खऱ्या अर्थाने देश नक्षलवादमुक्त, सुरक्षित आणि प्रगतिपथावर नेला जाऊ शकतो.

# वक्तृत्व आणि युवा उत्कर्ष



मानवी जीवनाचे सार्थक करुन घेण्यासाठी वक्तृत्व कला आत्मसात करणे खूप महत्वाचे. वाणीसामर्थ्याचे महत्व समजणाऱ्या तपस्व्यालाच त्या साधनेचे महत्व कळते. त्यामुळेच त्यासाठी अपार मेहनत घेण्याची त्याची तयारी असते.वाणीवैभवाचा परिसस्पर्श मला लाभला तर माझ्या जीवनाचे सोने होणार आहे. माझ्या जीवनात अनंत सुवर्णक्षण त्यामुळे येणार आहेत. हे समजण्यास काही प्रमाणात आरंभ होतो तेंव्हा त्यासाठी त्या दिशेने भावी वक्त्याच्या आंतरक्रिया सुरु झालेल्या असतात. मानवी जीवनाची वाटचाल अशी सकारात्मक बदलाच्या दिशेने होत असते,तेंव्हा त्या व्यक्तीला काही पूर्व संकेत मिळतात. मिळणारे संकेत हे आपल्या भावी जीवनातील यशाचे संदेश देणारे आहेत, हे मात्र कळावे. तो धागा त्वरित पकडावा आणि पुढील वाटचाल सुरु करावी. अनेकदा दैनदिन व्यवहाराचा विचार करुन आपण जीवनातील सुवर्ण क्षण वाया घालवतो. ' हे असे झाले त्यामुळे मी ते करु शकलो नाही.' अशी् कारणे सांगुन जागीच थांबणारे स्वत:ला खूप मोठे स्थितप्रज्ञ, योगी,तपस्वी समजतात, काही सज्जन लोकही त्यांना तसे समजण्याची चूक करतात, पण कारणे सांगून सक्रीय न होणारी माणसे निष्क्रीय असतात. आपल्या पाषान प्रवृत्तीचे उदात्तीकरण करुन जीवनातील शिल्प न शोधण्याचा तो आळसी प्रयोग असतो. त्यासाठी काहिच करण्याची गरज नसते.

ज्यावेळी पूर्वपुण्याईने आपोआप प्राप्त झालेली धनलक्ष्मी मोठ्या प्रमाणात असेल पण जिभेवरील सरस्वतीचे काय? धनलक्ष्मीने संपन्न असणारा कुबेर वाणी साम्राज्यात निष्कांचन आहे. त्यावेळी त्या धनलक्ष्मीची उपयुक्तता काय? हल्लीच्या राजकारणातील आरोप प्रत्यारोपाचे निरीक्षण केल्यावर,हे सर्व विलक्षण असल्याचा साक्षात्कार होतो आणि मग थोडासा विचार केल्यावर, झोपडपट्टीवर राहणारे लोक यांच्यापेक्षा अधिक संस्कारशील वाटू लागतात. वक्तृत्व कला युवा अवस्था समृद्ध,संपन्न आणि सामर्थ्यशाली बनविते. प्रारंभिक अवस्थेतच नित्य जीवनातील संभाषनकला साध्य होते. उत्तम संवाद साधणे सहजसाध्य वाटू लागल्यास तणावमुक्त जगणे शक्य होते. जीवनातील निराशा नष्ट होऊन संपूर्ण नव्या आशेची किरणे दिसू लागतात. जगावे कसे ? हा भिषन प्रश्न वाटत नाही. याच ठिकाणी युवा अवस्थेतील अर्धी लढाई तुम्ही जिंकलेली असते. व्यक्ती किंवा समूहावर उत्तम प्रभाव पाडण्याचे तंत्र अवगत होणे मानवी जीवनातील यशाचे गमक आहे. ही बाब व्यक्त होणारा आणि श्रवण करणारा उभय पक्षाला आनंद देणारी असते. आपला विचार,आनंद,दु:ख,व्यथा व्यक्त करतांना समोरील व्यक्तीच्या मनाचा व मेंदूचा अंदाज आपण घेऊ शकतो. एका अर्थाने हे खूप मोठे यश तर् आहेच पण ते आपल्या जीवनातील वैभव आहे,याचा युवकांना विसर पडू नये. मानवी संस्कृतीची समृद्धी,संपन्नता,ऐश्वर्य वाढविण्याचे काम हे वाणी वैभव करत असते. एका व्यक्तीने मांडलेले विचार हजारो माणसापर्यंत पोहचवीता येतात. आज आंतरजालाने तर ती व्याप्ती कितीतरी व्यापक झाली आहे. मनामनाला खुलविणे, फुलविणे शक्य होते. विचारांचा सुगंध सर्वत्र दरवळतो. अविचार व दुष्कृत्यापासून सद्विचाराकडे जाणे शक्य होते. समाजजीवन उन्नत करणे शक्य होते. त्यामुळे वक्तृत्व कलेला बोलघेवडेपणा असे म्हणून या वाणीवैभवाचा अपमान करणाऱ्या अविचारी व्यक्तीमत्वाची कुवत तपासून पाहणे गरजेचे असते. तद्वतच या कलेच्या माध्यमातून श्रोत्यावर सूड घेणाऱ्या वक्त्याची योग्यता लक्षात घेऊन श्रोते त्याला त्याची जागा दाखवण्याचे सत्कार्य करत असतात. हे वास्तव मान्य करुन एक गोष्ट स्पष्ट करणे गरजेचे आहे. समूह मानसशास्त्र बदलण्यासाठी खूप कालावधी लागतो. कोणताही सकारात्मक बदल स्विकारण्यास सर्वसामान्य माणूस तयार होत नाही. तार्कीक विचार करणारे लोक समाजात वाढत गेले तर दिशाहिन लोकांना जगण्याची दिशा मिळू शकेल. त्यामुळे सातत्याने समाजास बौद्धीक देऊ शकणाऱ्या लोकांची गरज आहे. समाजाला संस्कार व दिशा देण्याचे काम बुद्धीवादी वर्ग करतो. हे काम बुद्धीवाद्यांनी निरपेक्ष,पारदर्शी व प्रामाणिकपणे केले पाहिजे. हे काम करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकावर दिशा देणाऱ्या व्यक्तीचे प्रेम असावे. त्यांच्या विचारात विवेकवाद, बुद्धीप्रामाण्यवाद आणि समाजाला पुढे घेऊन जाणारा परिवर्तवाद असला पाहिजे. सर्वांना तिमिरातून तेजाकडे नेण्याची ओढ त्यांच्या आचारविचारात आंतर्बाह्य असली पाहिजे. मला अज्ञानी समाजाला दृष्टी देण्याचे कार्य करायचे आहे. त्यासाठी कष्ट करायचे आहेत.अपार मेहनत घ्यायची आहे. हे काम करतांना मला खूप झिजावे लागणार आहे.खपावे लागणार आहे.त्यासाठी मला प्रस्थापित व्यवस्थेचा विरोध सहन करावा लागणार आहे. हा मार्ग,खडतर,काटेरी आणि सर्वोतोपरी धोक्याचा आहे. तरीही मला या मार्गाने चालायचे आहे कारण ते माझे जीवित कार्य आहे. आपल्या कामावर ज्या व्यक्तीची नितांत श्रद्धा आहे, तोच हे प्रबोधन कार्य प्रामाणिकपणे करु शकतो. त्यासाठी नवनविन तंत्र शिकण्याची आणि ती आपल्या प्रबोधन कार्यात आणण्याची त्याची तयारी असते.

मानवी जीवन समृद्ध करण्याचा वसा घेणाऱ्या मार्गदर्शकाची वाणी समृद्ध असली पाहिजे. त्याला आपल्या शब्दाने अनेकांची मने जिंकता आली पाहिजे.विचारांचा अखंड झरा त्याच्या कंठातून प्रवाहित झाला पाहिजे.सूत्रबद्ध आणि सहज समजेल अशा शब्दात बोलत राहणे ही एक फार मोठी कला आहे,पण त्या मागे एक दीर्घ आणि अखंड साधना आहे. त्या साधनेचा उपयोग समाजाचे मन आणि विचार उन्नत करण्यासाठी वत्क्याला करायचा असतो. त्यासाठी वक्त्याने व्यासपीठावर आरुढ होऊन आपल्या वाणी वैभवाने अनेकांची कर्णतृप्ती, मनतृप्ती करुन त्यांची विचारउंची वाढवून मानवीसमृद्धी वाढवायची असते. वक्त्याला सदैव समाजोन्नती व राष्ट्रोन्नती अपेक्षित असली पाहिजे. मातृभूमीला उद्देशून ' वक्तृत्व वाग्वैभवही तुज अर्पियले ' हाच विचार त्याच्या मनात आणि कृतित असला पाहिजे. हे कार्य माईकप्रेमी कधीच करु शकत नाहीत.फोटो, बातमी,प्रसिद्धी आणि त्याचे रेकॉर्ड त्याचा आधार घेऊन आपले समाजकार्य व राष्ट्रकार्य सिद्ध करणारे नतदृष्ट नेहमीच सहनशील श्रोत्यांचा अंत पहाण्याचे दुष्कृत्य करत असतात. समाजातील प्रबोधनाचा आणि त्यांचा सूतराम संबध नसतो. त्यासोबतच ज्यांना आपल्या वक्तृत्वामधून अंधश्रद्धा,दैववाद,सूड, द्वेष,मत्सर आणि अंतर्गत कलह,जातियवाद व धर्मांधता निर्माण करावयाची असेल त्यांची वाणी अत्यंत प्रभावी असेल तरी ती फक्त विष ओकण्याचे काम करत असते. अनेक अतिरेकी सुद्धा प्रभावी वक्ते आहेत,पण त्यांचा उद्देश मात्र संपूर्ण जगाला विनाशाकडे घेऊन जाणारा आहे. आपल्या वाणीसामर्थ्याचा उपयोग मानवतेच्या कल्याणासाठीच झाला पाहिजे. ज्ञानदान,प्रबोधन, श्रोत्याची कर्णतृप्ती,मनतृप्ती,त्यांच्या विचारातील परिवर्तन, मानवी विकास या आणि अशा कितीतरी बाबी विचारपीठामधून परावर्तित झाल्या पाहिजे. नसता चालणारे उद्देशहिन व नकारात्मक प्रयोजन विचारापीठाची बदनामी करते.

सकारत्मतक दिशेने सत्कार्यासाठी तेवढ्याच प्रभावीपणे केलेले वक्तव्य मानवी जीवन संपन्न बनविते. आपल्यातील उपजत गुणांना आपण स्वप्रयत्नाने किती विकसित करतो ? त्यावर किती प्रमाणात चिंतन,मंथन,मनन व नियोजन करुन आपण प्रत्यक्ष प्रयत्न करतो, यावर वक्त्याने आत्मपरीक्षण करणे गरजेचे असते. वक्तृत्व एक संवाद असतो. तो वादविवाद,वादसंवाद आणि आत्मसंवादही असतो. वक्तृत्व उपजत कला असली तरी ती प्रयत्नसाध्य आहे. त्या कलेने तो श्रोत्याच्या आंतरक्रियेशी एकरुप होतो आणि त्यांच्या मनाची, विचारांची तार छेडतो.त्यांना व्यापक विचार करायला भाग पाडतो. संकुचित विचारांना सोडचिठ्ठी देण्यासाठी बाध्य करतो.आपले विचार हावभाव शब्दातील आरोह,अवरोहाने प्रसंग जिवंत करतो.सलगपणे एकसूत्री विचार ओघवत्या भाषेत घेऊन शेवटच्या क्षणापर्यंत श्रोत्यांना आपल्या वक्तृत्व शैलीच्या बळावर एकाग्र करतो. व्याख्यान सुरु असतांना व ते संपल्यावरही जो वक्ता श्रोत्यांच्या हृदयसिंहासनावर अधिराज्य गाजवतो. त्याला विसरण्याचा प्रयत्न करुनही तो कायम स्मरणातच राहतो. त्याला खऱ्या अर्थाने प्रबोधनाचा मार्ग सापडलेला असतो. श्रोत्यांच्या नाडीचा शोध त्याला लागलेला असतो. मानवी उत्कर्षाचा मार्ग त्याने जाणलेला असतो. तो श्रोत्यांचा प्रेरक शक्तीस्थान बनतो. तो विशेषत्वाचा शोध घेऊन अनेकांना बोध देतो. त्याचे शब्द म्हणजे अमृतवाणी. तो निराश,हताश,उदास जीवांना शब्द संजीवनी देतो. जगण्याचे बळ देतो. मनुष्य जीवनाचा अर्थ सांगतो. मानवी जीवन समृद्ध व संपन्न बनविण्यासाठी एका अर्थाने तो उच्च आणि उदात्त अवतार कार्यच करत असतो. त्या वक्त्याला वक्तृत्व इतिहासात मानाचे स्थान प्राप्त होते.तो अजरामर होतो. देहाने संपला तरी श्रोत्यांच्या मन्मनात अस्तित्व निर्माण करतो. त्याचे मानवी उत्थानाचे कार्य अखंड अविरत सुरुच असते. त्याचे विचार वर्षानुवर्षे मानवी मनावर अधिराज्य करतात. त्या शब्दसामर्थ्याने मानवी मनाला जगण्याचे बळ देतात.उच्च मानवी कार्य करण्याची प्रेरणा देत राहतात. वाणीसामर्थ्याचे हे व्यापक महत्व लक्षात घेऊन वाणीवैभव आपल्या जीवनात किती महत्वाचे! हे युवाशक्तीच्या ध्यानी यावे. आपल्या दैनंदिन व्यवहारातही आपल्या वाणीवैभवाचा उपयोग नेमका कसा करावा, हे जरी प्रत्येकास कळाले,तरी दैनंदिन जीवन खूप सुसह्य होईलं. ज्याला या क्षेत्रात उंच भरारी घ्यायची त्याला खूप परिश्रम घेऊन यशस्वी होण्यास मनापासून शुभेच्छा.

**–प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा...

तू एक आस
मनातला ध्यास
जिथे उभा मी
तिथे तू श्वास
सबंध आयुष्यात

आपण अनेक नाते निर्माण करतो. काही जन्मल्याबरोबर लगेच आपोआप लागतात, तर काही जगताना वाढत जातात, तर काही आपल्याकडून जाणीवपूर्वक वाढवली जातात. त्यातलचे एक नाते म्हणजे मित्राचे- मैत्रीचे! लहान असो की वयोवृध्द प्रत्येकाला एक मित्र असतो. काहींना तर खूप सारे असतात. आपण कसे वागतो यावर त्यांची संख्या ठरते. ते वागणेही मग त्या त्या हिशोबाचे असेल आणि मित्रही त्याच हिशोबाचे राहतील. मित्र म्हणजे सखा, सोबती असे समानार्थी शब्द आहेत. मित्र म्हणजे आपलासा वाटणारा, रक्ताचा नसला तरी सुख दुःखे वाटून घेणारा एकमेव सोबती असतो. ज्याच्यापुढे कुठलीच लाज नसते. प्रत्येक गोष्ट सांगू शकू एवढा हक्काचा तो असतो. मित्राला ना लिंगाचे बंधन आहे ना जाती - धर्माचे, वंशाचे. जसे की अनेक स्त्री-पुरुष एकमेकांचे भिन्न लिंगी मित्र आहेतच की. त्यातही काही गोष्टींचे बंधन असू शकेल पण मैत्रीला ते कधी आड येत नाही.

मित्र म्हणजे जणू आपण स्वतः, जसा काय आपला आरसा. जसा स्वभाव, जसे वागणे, जशा सवयी आपले मित्रही बहुदा तसेच असतात. चांगल्यांना चांगले मिळतात तर वाईटांना वाईट. कारण मैत्री तेव्हाच होते जेव्हा मित्रांची मते जुळतात. मते जुळले की मनेही आपोआप जुळतात. त्यामुळे अभ्यासू लोकं अभ्यासूंच्या सहवासात असतात तर व्यसनी व्यसनीजणांच्या. असे नाही की यामध्ये ढवळा ढवळ होत नाही. अर्थात मैत्री अगोदर एक जग आहे- 'गरजांचे'. त्या पूर्ण करायच्या म्हणजे न आवडणाऱ्याशीही जुळवून घ्यावे लागते. जसे की एकत्र काम करणारे सहकारी. जे सोबत राहून बऱ्यापैकी एकमेकांना जाणतात. जिथे बऱ्याच गोष्टींचे अदान- प्रदान होत असते. काहीजण इथे पक्क्याने विसावतात तर काहीजण कामापुरते. जे कामापुरते असतात ती सहवास संपला की नातेही संपवतात. आता हेच पहा, आपल्या कॉलेज जीवनात बरेच मित्र होते त्यातले तुम्हाला किती आठवतात आणि आता किती संपर्कात आहेत. आपण बऱ्याच वेळा म्हणतो की, '' हा माझा बालमित्र आहे. जो आता तेवढेच सांगण्यापुरताच राहिला. कारण जुळवून घ्यावे असे आचरण दोघातही उरलेले नसते. दोघांचा पेशा हा वेगवेगळा झालेला असतो तिथे बालमित्राची गरज व उणीव जाणवत नाही. मुले मुलींपेक्षा या नात्यात थोडी स्वार्थीच असतात. कारण मुली तरी मैत्रिणींना कधी विसरत नाहीत. त्यांच्याकडे बाल मैत्रिणींपासून ते कॉलेजपर्यंतच्या सोबतीनींचे काँटॅक्टस् अजूनही आहेत. ज्या त्यांना कालांतराने बोलून मध्ये- मध्ये संपर्कात राहतात. मुले मात्र 'गरज सरो वैद्य मरो'

मुळात मैत्रिवरती लिहावे इतका मित्रांच्या गराड्यातला माणूस मी नाही. माझे म्हणावे असे फारच कमी जवळचे आहेत. कदाचित मी अपुरा असेल नाहीतर समोरचा. पण जे आहे त्यात मी खूष आहे. तसे पाहता माझेही मोजकेच मित्र आहेत. असे मित्र की जे मलाही त्यांचा मित्र समजतात. कारण नाते व ओढ दोन्हीकडूनही तितकीच हवे. तरीसुद्धा मला यावरती लिहायची गरज भासली कारण याच मित्रांच्या गराड्यातले अनेक माझे मित्र आहेत. जे 'मित्र' नावाच्या फासात अडकून राहणे पसंत करतात. त्यांचा हा 'फास', 'फास'च असून मित्र नाही हे सांगण्यासाठी लिहतोय.

मैत्रीची व्याख्या खरी एक आहे आणि खोटी एक. सुरुवातीला खरी सांगतो. ' मित्र म्हणजे असा सोबती जो मार्गदर्शक असून मित्राचे नेहमी चांगले चिंतन करतो.' आणि एक खोटी - ' मित्र म्हणजे असा सोबती जो गरजेपुरता सोबत असतो.'

मुळात या दोन्ही व्याख्या का कराव्या लागल्यात? कारण दुसरी व्याख्या सध्या खरी होवू पाहत आहे आणि पहिली व्याख्या ही पहिली आहे यातच खूष आहे. जो पहिला नंबर काठावर पास होवून पहिला असण्यात समाधानी आहे. 'आस' नावाच्या शब्दाची जागा 'फास'ने घेतली आहे. शोधण्यासाठी म्हणून नाही तर जे सापडले ते आपल्यापुढे मांडायचे म्हणून. सध्याचे मैत्रीचे नातेच मुळात व्यावसायिक झाली आहे. फायदा तिथे मैत्री झाली आहे. जिथे फायदा नाही तिथे मैत्रीपण नाही. जीवाला जीव देणारे दोस्त आता कुठेच सापडत नाहीत. कारण तितके मरण्यापर्यंत जाण्याची कोणात धमक उरलेली नाही.

मित्र म्हणजे मदतीला धावून येणारा असेही आपण येतो. पण नेहमी आपणच मित्र व्हायचे सगळी जवळची माणसे, कामे सोडून त्याचे काम करायला पळत सुटायचे आणि त्याची वेळ आली की असेच काहीतरी महत्वाचे काम आले म्हणून त्याने स्तब्ध बसायचे, हे स्वार्थी नाही म्हटले तरी त्याच्यासाठी 'हो' आणि आपण का 'हो' होवू नाही. मित्र म्हणजे आतला पाझर म्हणे, पण तोही आता आटत चाललाय. आणि हे आटणे इतके भयंकर आहे की काळीजही केवळ हदय म्हणूनच धडकत आहे.

मित्राची सोबत असतानाची निंदानालस्ती समजू शकू, मित्राचे कदाचित ते वाट दाखवणे असू शकेल. पण माघाऱ्याची वाजवावाजवी केवळ भित्रे 'शत्रूत्वच' आहे.

व्यसनी मित्र असू शकतो पण व्यसनी करणारा नाही. त्याचे नुकसान झाले म्हणून आपलेही करावे तो मित्र कसला. तुम्ही हजार गोष्टी त्याच्याबद्दल चांगल्या सांगता पण तो एक चांगला शब्द आपल्यासाठी उच्चारत नसेल तर त्याच्यापासून दूरच रहा. माहिती लपवणारा, तुम्हालाच खोटेनाटे सांगणारा मित्र कसा असेल बरं! माघारी वाजवणारा तरी भित्रा शत्रू असेल पण पुढून विनाकारण चूक काढणारा तर खुला-खुला मित्राच्या वेशातला शत्रुची की! मित्र सुख-दुःख वाटून घेतो पण आपलेच सुख बरे न दिसणारा असेल तर हा आव्हानाच्या मार्गातला जबरदस्ती आव्हानच की!

शंभर कोरडे असण्यापेक्षा दोन चार मोकळे कधीही कामाचे. चार स्तंभातला एकही भरोशाचा नसेल तर मोडकाच पण एक विश्वासाचा असावा, जो जिंकण्याचे बळ देईल तोच मित्र सदैव आपल्या ताईत ठेवावा.

मित वणाव्यामध्ये गारवा देणारा असेल तर तुम्हीही कधीतर गारवा दिलेला असावा लागतो. दुसऱ्याकडून अपेक्षा ठेवताना स्वतः रिकामे राहणे हे कुठल्याच व्याख्येत बसणारे नाही. स्वतः ला ओळखायला जिंदगी संपते पण लोकांना ओळखायला एक क्षण पुरेसा असतो. फेसबुकवर अनोळखी चेहऱ्यांचे लोकं मित्र करताना ओळखीचे आधी ओळखा. नाहीतर गराडा करण्याच्या नादात कधी चुराडा झाला हेच कळायचे नाही.

त्यामुळे सोबत राहणे व नुसतेच गरजेपुरते एकमेकांना झेलने म्हणजे मैत्री नसते. जिथे ओलावा नसतो मुळात तिथे पाझर नसतो; आणि जिथे सगळेच आटलेले आहे तिथे जबरदस्ती मित्र शोधायचा नसतो.

तुझा चेहरा तर
माझ्यागतच आहे
मन इतके कलुषित
असेल तर,
शत्रू काय वाईट आहे...

**–अमोल चंद्रशेखर भारती,**
नांदेड
मो. ८८०६७२१२०६

# शिव्या शाप देणारा नव्हे तर आशीर्वाद देणारा व्यवसाय करा!

अवैध दारू साठा जप्त, लाखो रुपयांचा गुटखा जप्त, कोट्यावधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त, शेतामध्ये गांजा पिकवणारा गजाआड, जुगाराच्या क्लबवर धाड, मटक्याच्या अड्ड्यावर धाड, सावकाराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या, अधिक पैशाचे आमिष दाखवून लाखो रुपयाला गंडा, फसवून जमीम बळकावली या आणि अशाप्रकारच्या अनेक बातम्या आपण नेहमीच वर्तमानपत्रात वाचत असतो. दररोजच्या वर्तमानपत्रात अशा प्रकारची एक तरी बातमी आपल्याला वाचायला मिळते. विशेष म्हणजे चार वर्षांपूर्वी जेंव्हा देशभर कोरोना होता, कोरोनामुळे संपूर्ण देशात लॉक डाऊन घोषित करण्यात आले होते. संपूर्ण देश कुलूपबंद होता तेंव्हा देखील अशाप्रकारच्या बातम्या वाचायला मिळत होत्या. गुटखा, गांजा यासारख्या अमलीपदार्थांवर राज्यात बंदी आहे.

राज्यातील काही जिल्ह्यात दारूवर देखील बंदी आहे मात्र बंदी असतानाही काही महाभाग या बंदीची संधी साधून गुटखा, गांजा बाजारात विकायला आणतात. विशेष म्हणजे हे अमली पदार्थ ब्लॅकने विकली जातात म्हणजे अधिक पैसे देऊन ती विकले जातात. ज्या जिल्ह्यात दारूवर बंदी आहे तिथे देखील ब्लॅकने दारू विकली जाते. काही ठिकाणी पोलीस आणि प्रशासनाचे हात ओले करून बेधडकपणे या पदार्थांची विक्री केली जाते. जुगार मटका यासारखे अवैध धंदे देखील असेच बेधडकपणे सुरू असतात. वरिष्ठांकडून दबाव आल्यास कारवाईचा दिखावा केला जातो, काही दिवसांनी या अवैध व्यवसायांचा पुनश्च हरिओम होतो. कारण संबंधितांनी सोडलेली लाज. केवळ पैसे कमावणे या एकाच उद्देशाने हे महाभाग समाजाचे आरोग्य धोक्यात आणतात. गुटखा खाल्ल्याने दरवर्षी लाखो लोक कर्करोगासारख्या असाध्य रोगाला बळी पडतात.



गुटखा खाल्ल्याने कर्करोग होतो हे माहीत असूनही गुटखा बनवणारे गुटखा बनवतात, विकणारे विकतात आणि खाणारे खातात. दारूबंदीचा फक्त फार्स केला जातो. ज्या भागात दारूबंदी आहे त्या भागात तर जास्त दराने दारू विकली जाते. ड्राय डे च्या दिवशीही दारू ब्लॅकने विकली जाते. दारूमुळे लाखो कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. दारूमुळे संसाराची राखरांगोळी होते. दारू पील्यामुळे यकृताचा आजार होतो. त्या आजारात जर घरातील कर्त्या पुरुषाचा मृत्यू झाला तर त्याची लेकरे बाळे उघड्यावर पडतात हे माहीत असूनही लोक दारू पितात कारण त्यांना ती सहज उपलब्ध होते.

जुगार आणि मटका खेळून अनेकजण कर्जबाजारी झाले आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी सावकाराकडे जाण्याची वेळ अनेकांवर येते. सावकाराकडून काढलेले कर्ज फेडता न आल्याने काहींनी आत्महत्या केल्या आहेत. मटका जुगारामुळे जमीन जुमला विकण्याची वेळ काहींवर आली आहे. हजारो लोकांचे आयुष्य उध्वस्त करणारे, समाजाच्या आरोग्याची नासाडी करणारे कर्करोगासारख्या असाध्य रोगाचा विळखा घालून मृत्यूसमीप नेणारे उद्योग कोणी करू नये अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा असली तरी हे सारे सुरूच आहे याचे कारण हे व्यवसाय करणाऱ्या महाभागांना याचे काही देणेघेणे नाही त्यांना हवाय तो फक्त पैसा.

पैशासाठी सर्वकाही! या उक्तीप्रमाणे हे लोक काम करतात. यांना कोणाच्या संसाराचे देणेघेणे नाही की कोणाच्या आरोग्याचे. यांचा उद्देश केवळ आणि केवळ पैसा कमावणे हाच आहे. आपला पैसा कमावण्याचा व्यवसाय हा कोणाचा तरी संसार उध्वस्त करणारा असेल तर त्या पैशातून आपल्याला समाधान मिळेल का ? याचा विचार संबंधितांनी करावा. ज्यांचा संसार उध्वस्त झालाय, व्यसनांमुळे ज्या घरातील कर्ता पुरुष देवाघरी गेलाय त्या घरातील लोक या लोकांना शिव्याशापच देत असतील. तेंव्हा असा शिव्या शाप मिळणारा व्यवसाय करण्याऐवजी लोकांचे आशीर्वाद मिळतील असा व्यवसाय संबंधितांनी करावा.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

## थोडक्यात...

### डॉ. अजिंक्य बगडे यांना पीएचडी पदवी प्रदान



**लोहा (प्रतिनिधी)–** कोल्हापूर येथील डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाने डॉ. अजिंक्य बगडे यांना थीन फिल्म्स या विषयावर शोध प्रबंध सादर केल्याबद्दल त्यांना पीएचडी पदवी प्रदान केली.

लोहा शहरातील शिवकल्याणनगर भागातील माजी नगरसेविका शोभा नळगे–बगडे यांचे सुपुत्र डॉ. अजिंक्य बगडे यांनी ऊर्जा साठवण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या सुपरकॅपेसिटर आणि बॅटरीसाठी प्रभावी आणि कार्यक्षम 'थिन फिल्म्स' या विषयावर आधारित शोध प्रबंध कोल्हापूर येथील डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाकडे सदर केला. डॉ. बगडे यांना प्रसिद्ध शास्त्रज्ञ प्रा. डॉ. सी. डी. लोखंडे यांनी संशोधन पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन केले. डॉ. अजिंक्य बगडे यांच्या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### निबंध स्पर्धेत आरती मोकळे प्रथम



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** योग दिनानिमित्त तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत कै. गं. पो. सब्बनवार हायस्कूलची आरती बालकिशन मोकळे हिने प्रथम क्रमांक मिळविला.

या यशाबद्दल संस्था सचिव डॉ. प्रशांत सब्बनवार, मु.अ के.बी. गायकवाड, मार्गदर्शक आर. व्ही शिंदे, सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. ही स्पर्धा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणपत वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधिकारी डॉ.सारिका अनमुलवाड यांच्या नियोजनात पार पडली. तसेच स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. नरेश बोधनकर आणि प्रा.डॉ.वैजनाथ अनमुलवाड यांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे आणि कौशल्याचे योग्य मूल्यांकन केले.

# माळेगाव यात्रा परिसरात जिल्हा परिषदेच्या जागेत तालुका कृषी विभागाने केले 'जलयुक्त'चे काम

## ना शेत, नाही नाली–नाला, माळरानावर चर केले; पाणी आडवा की पैसे जिरवा?



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा तालुका कृषी विभागाच्या कामे यावर कोणाचाच वचक नाही. प्रभारी तालुका कृषी अधिकारी हे गेल्या वीस–बावीस वर्षांपासून याच तालुक्यात वेगवेगळ्या पदावर येथे आहेत. साडे पाच वर्षांत ते चारवेळा प्रभारी तालुका कृषी अधिकारी झाले असून या दोन वर्षांपासून त्यांच्याकडे अतिरिक्त पदभार आहे. माळेगाव यात्रा परिसरात जिल्हा परिषदेच्या रेस्ट हाऊस मागील जागेत कृषी विभागाने खडकाळ रानात जलयुक्त शिवाराची कामे केली असून छोटे छोटे चर काढले आहेत. या माळावर ना शेती आहे, नाही येथे पाणी जिरवण्याची गरज आहे. ही कामे म्हणजे शुद्ध धूळफेक असून मुख्यमंत्री यांच्या ड्रीम प्रोजेक्टचे कृषी विभाग कसा बट्ट्याबोळ करताहेत हेच या निमित्ताने समोर आले आहे.

लोहा तालुका कृषी कार्यालयाचे निष्क्रिय प्रशासन असूनही वरिष्ठ मात्र पाठराखण करतात, अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांना वचक नाही. काही कृषी सहायक काही सुपरवायझर तळमळीने काम करतात तर काही कृषी सहायक महिना–महिना त्या गावात फिरकत नाहीत. कागदोपत्री काम, अहवाल दिला जातो, फार्मर आयडीसाठी शेतकऱ्यांना उद्युक्त केले जात नाही. तसेच बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन, पीक वाढीसाठी घ्यावयाची काळजी तसेच विविध योजना याबाबत माहिती वेळेवर दिली जाते की, नाही याचे नियंत्रण करणारी यंत्रणाच निष्क्रिय आहे. या तालुक्यातील ५५ हजार शेतकऱ्यांची संख्या कृषीच्या माहिती पुस्तकात नमूद आहे. त्यापैकी केवळ चार शेतकऱ्यांने पीक स्पर्धेत सहभाग नोंदविला, यावरून प्रभारी तालुका कृषी अधिकारी यांचे प्रशासन किती गतीमान आहे याचा प्रत्यय येतो.

पोटपेलवार यांच्याकडे मागील दोन वर्षांपासून तालुका कृषी अधिकारी पदाचा पदभार आहे. त्यांना मदतीला एका कृषी मंडळ अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती करण्यात आली आहे. तरीही हे कार्यालय शेतकऱ्यांसाठी गतिमान झाले नसून अनेक शेतकऱ्याच्या तक्रारी मोठया प्रमाणात आहेत. यात्रा परिसरात, जलयुक्तची कामे दिसता चट्टा, डॉक्टरांना भेटा असे ब्रीद आरोग्य खात्याचे पण बदलत्या काळात दिसता माळरान –करा जलयुक्तचे चर अशी मोहिम जणू लोहा तालुका कृषी विभागाचे आहे की, काय अशी शंका उपस्थित होते आहे.

माळेगाव यात्रा परिसरात या विभागाने जलयुक्तीची कामे केली आहेत. जिल्हा परिषदेच्या विश्रामगृहा मागील भागात जलयुक्तची कामे करण्यात आली आहेत. या विभागाची परवानगी घेण्यात आली नाही, याबाबत संबधित कृषी सहायक, सुपरवायझर यांच्याशी संपर्क साधला, पण संपर्क होऊ शकला नसल्यामुळे त्यांचे म्हणणे कळू शकले नाही. मुख्यमंत्री यांच्या ड्रीम प्रोजेक्ट जलयुक्त शिवार आहे. पहिल्या टप्प्यात लोहा तालुक्याच्या कृषी विभागाने आंबेसांगवी येथील नदी खोलीकरण केली. तत्कालीन तालुका कृषी अधिकारी विश्वाभर मंगनाळे यांच्या काळात हे काम पथदर्शी ठरले, खुद्द मुख्यमंत्री फडणवीस यांनी जलपूजन केले होते. त्याच कार्यालयाने जलयुक्तच्या दुसऱ्या टप्प्यात चक्क माळ रानावरचे जत्रा भरते तेथे शेतही नाही आणि शेतकरी सुद्धा नाही, तेथे चर केले. ती जागा जिल्हा परिषदेची आहे, यावरून कामे कशी सुरु आहेत, हे समोर आले आहे.

### मातोश्री कै.सौ. केवळबाई मिरेवाड वाङ्मय पुरस्कार २०२५ जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** नायगाव येथील मातोश्री कै.सौ. केवळबाई मिरेवाड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मराठी साहित्यातील कादंबरी, कथासंग्रह आणि बालसाहित्य या विभागात दरवर्षी साहित्यिकांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

पुरस्काराचे हे सहावे वर्ष असून यावर्षी कविता विभागात इसाप प्रकाशन, नांदेड यांनी प्रकाशित केलेल्या व्यंकटेश चौधरी यांच्या 'अनाहत' या कवितासंग्रहाला, सप्तर्षी प्रकाशन मंगळवेढा यांनी प्रकाशित केलेल्या रेश्मा माणिक गुंगे यांच्या 'आत्मभान' या कथासंग्रहाला तसेच कादंबरी या क्षेत्रात मेधा पब्लिशिंग हाऊस अमरावती यांनी प्रकाशित केलेल्या विशाल मोहोड यांच्या 'कीड' या कादंबरीला आणि बालसाहित्य विभागात मुंबई येथील सदानंद पुंडपाळ यांच्या 'गवसणी आकाशाला' या प्रणाली प्रकाशन पुणे यांनी प्रकाशित केलेल्या बालकथासंग्रहाला घोषित करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यातील ग्रंथगौरव पुरस्कार विभागात सायास प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या मोतीराम राठोड यांच्या 'वचपा' या पुस्तकाला तसेच अक्षर वाङ्मय प्रकाशनने प्रकाशित केलेल्या श्रीनिवास मस्के यांच्या 'बाईचा दस्तऐवज' या कवितासंग्रहाला आणि इसाप प्रकाशन नांदेड यांनी प्रकाशित केलेल्या भारत दाढेल यांच्या 'किस्ना' या कादंबरीची निवड करण्यात आली.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अशोक कौतिक कोळी, अक्षर गणगोतचे संपादक पांडुरंग पुठ्ठेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षण समितीने या पुरस्काराची निवड केली आहे. रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. मातोश्री कै.सौ. केवळबाई मिरेवाड पुरस्काराचे संयोजक वीरभद्र मिरेवाड यांनी या पुरस्कारांची घोषणा मातोश्रीच्या पुण्यस्मरणदिनी नायगाव येथे केली. लवकरच नांदेडचे खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली नायगाव येथे पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.



**लोहा :** येथील मराठ गल्लीमध्ये श्री शिवलिंगेश्वर महादेव मंदिर व शिवलिंग प्राणप्रतिष्ठा व कलशारोहणाप्रसंगी शहरातून महिलांनी कलश मिरवणूक काढली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. (छाया : विनोद महाबळे)

### माहूर तालुक्याची भारतीय बौद्ध महासभेची कायकारिणी जाहीर

**माहूर (प्रतिनिधी)–** भारतीय बौद्ध महासभा माहूर तालुक्याची नुकतीच नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली.

भारतीय बौद्ध महासभेचे नांदेड जिल्हा कोषाध्यक्ष सुभाष नरवाडे यांच्या अध्यक्षतेखाली हिशोब तपासणीस अप्पाराव येरेकार, किनवट तालुका पर्यटन व प्रसार उपाध्यक्ष सुरेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली.

यावेळी तालुका अध्यक्ष ॲड.छंदक वाठोरे, तालुका सरचिटणीस प्रा.विनोद कांबळे, तालुका कोषाध्यक्ष प्रा.डॉ. राजेंद्र लोणे, उपाध्यक्ष (संस्कार) विजय भगत, उपाध्यक्ष (पर्यटन व प्रसार) प्रकाश मुनेश्वर, उपाध्यक्ष (संरक्षण) आकाश कांबळे, कार्यालयिन सचिव रविंद्र गायकवाड, हिशोब तपासणीस ॲड.सुभाष कांबळे, संस्कार सचिव ॲड.राहुल भवरे, संस्कार सचिव ॲड. प्रविण वाघमारे, पर्यटन /प्रसार सचिव दीपक कांबळे, पर्यटन/प्रसार सचिव मनोज किर्तने, संरक्षण सचिव रेणुकादास वानखेडे, संरक्षण सचिव महेंद्र वाघमारे, संघटक सर्कल सिद्धार्थ तामगाडगे, संघटक सर्कल राजू जाधव, संघटक सर्कल शेषेराव पाटील, शामराव राऊत, संघटक सर्कल सुभाष खडसे, दयानंद भगत, झनक मानकर यांची निवड करण्यात आली.

### संचमान्यता व विद्यार्थ्यांचे लाभ देण्यासाठी ३० सप्टेंबर हाच निकष कायम ठेवण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** शाळांना संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांतर्गत मिळणारे लाभ देण्यासाठी ३० सप्टेंबर हाच निकष कायम ठेवावा त्यात बदल करू नये, अशी मागणी मराठवाडा शिक्षक सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे शिक्षण आयुक्त यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

राजकुमार कदम यांनी याबाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, आतापर्यंत शिक्षक संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमा अंतर्गत मिळणारे लाभ हे ३० सप्टेंबरच्या पटसंख्येवर दिले जातात परंतु राज्याचे शिक्षण आयुक्त यांनी २६ जून २०२५ रोजी शिक्षणाधिकारी यांच्या बैठकीत यावर्षी पासून शिक्षक संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमा अंतर्गत देण्यात येणारे लाभ देण्यासाठी ३० सप्टेंबरच्या विद्यार्थी पटाऐवजी ३१ जुलैच्या पटावर संचमान्यता व लाभ देण्याचे सुचित केले आहे. हा संदर्भ देऊन शिक्षणाधिकारी (मा.) बुलढाणा यांनी तसे आदेश त्यांच्या जिल्ह्यातील मुख्याध्यापकांना निर्गमित केले आहेत. तसे आदेश राज्यातील शिक्षणाधिकारी आपआपल्या जिल्ह्यात निर्गमित करतील त्या अगोदरच आपण मराठवाडा शिक्षक संघाच्या या निवेदनाचा विचार करावा कारण पंधरा जूनला शाळा सुरू होतात. त्यानंतर एक ते दीड महिना विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया सुरू राहते. त्यानंतर सर्व प्रवेशीत विद्यार्थ्यांची जनरल रजिस्टरला नोंद घेणे, विद्यार्थी प्रमोशन, युडायस, सरलला अपडेट करणे, आधार अपडेट करणे या सर्व ऑनलाईन प्रक्रिया होवून शाळेचा पट तयार होते. ही सर्व प्रक्रिया ३१ जुलैपर्यंत पुर्ण होणे शक्य नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. ते टाळण्यासाठी संचमान्यता व विविध उपक्रम ांतर्गत लाभ पुर्वी प्रमाणेच ३० सप्टेंबरच्या पटसंख्येवरच कायम ठेवावेत असे निवेदनात म्हटले आहे.

### भूजलसाठा वाढविण्यासाठी रिचार्ज खड्डे तयार करा –संजय मिरजकर



**नायगाव (प्रतिनिधी)–** अलीकडच्या काळात पाणी पातळी ही अतिशय खोल गेली आहे. त्यामुळे पाणी पातळी भूजलसाठा वाढविण्याच्या दृष्टिकोनातून प्रत्येक गावात रिचार्ज खड्डे निम र्ण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकारी यांनी पुढाकार घेऊन आपल्या गावात ठिक–ठिकाणी रिचार्ज खड्डे निर्माण करावेत, असे आवाहन नायगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय मिरजकर यांनी केले.

जलजीवन मिशनअंतर्गत टेक्नोस्पर्ट ग्राम विकास प्रतिष्ठान परभणी यांच्यावतीने तालुका परिसरातील सरपंच, गाव पातळीवरील आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका यांच्यासाठी दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न झाले. प्रशिक्षणात सहभागी प्रशिक्षणार्थी यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी नायगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय मि रजकर, विस्तार अधिकारी महेश मुखेडकर, समन्वयक इंदूरकर, प्रशिक्षक साईनाथ मंचेवार, अजय भंडारे, मनोज मोहरील, राजू गुट्टे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी सर्व प्रशिक्षणार्थी यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले असून विस्तार अधिकारी महेश मुखेडकर, समन्वयक इंदुरीकर, राजू गुट्टे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच व्यंकटराव नरवाडे, भगवानराव जाधव, शंकर डोईफोडे, लक्ष्मण कांबळे यांच्यासह आशा वर्कर, अंगणवाडी सेविका आदींची उपस्थिती होती.

### रोजगार व स्वयंरोजगारासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** रोजगार व स्वयंरोजगारासाठी राबविण्यात येणारी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना जिल्हा उद्योग केंद्र व खादी ग्रामोद्योग महामंडळ यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक–युवतींना नवीन व्यवसाय सुरू करावयाचा आहे. त्यांनी https://mahascmegp.gov.in या वेबसाईटवर अर्ज करावा किंवा योजनेच्या अधिक माहितीसाठी जिल्हा उद्योग केंद्र उद्योग भवन पहिला मजला शिवाजीनगर नांदेड येथे कार्यालयीन कामाच्या दिवशी प्रत्यक्ष भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यातीत शहरी व ग्रामीण सुशिक्षित युवतींची वाढती संख्या व उद्योग व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध ठिकाणी उपलब्ध होत असलेला स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेवून उद्योजकतेला चालना देणारी सर्व समावेशक मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या नावाने सुरू केला आहे. ही महत्वाकांक्षी योजना जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्र व खादी व ग्रामोद्योग मंडळ कार्यालयामार्फत राबविण्यात येते. ही योजना पूर्णत: ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येते. नवीन उपक्रम सुरु करण्यासाठी बँकेमार्फत दिल्या जाणाऱ्या कर्जास संलग्न अनुदान योजना आहे. ही योजना कायदेशिररित्या पात्र असणारे उत्पादन व सेवा उद्योग व्यवसायासाठी आहे.

### भोकर डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. फेरोज इनामदार तर सचिवपदी डॉ.सुरेश जाधव



**भोकर (प्रतिनिधी)–** शहरातील विश्रामगृह येथे भोकर शहर व तालुक्यातील सर्व डॉक्टर्स मंडळींची बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीत डॉक्टर असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. राम नाईक यांचा यशस्वीरित्या कार्यकाळ संपला असल्याने तालुका डॉक्टर असोसिएशनची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी तालुका अध्यक्षपदी डॉ. फेरोज इनामदार तर सचिवपदी डॉ. सुरेश जाधव यांची निवड करण्यात आली.

यावेळी तालुक्यातील ज्येष्ठ डॉक्टर भगवान जाधव, डॉ. पारवेकर, डॉ.उत्तम जाधव, डॉ. साईनाथ वाघमारे, डॉ.बेलगमवार, डॉ.विठ्ठल माने, डॉ.राम नाईक, डॉ.पुरुषोत्तम कल्याणकर, डॉ. विजय बोंदिरवाड, डॉ.आडे, डॉ. राहुल वानोळे, डॉ.राहुल कदम, डॉ.वसंत राठोड, डॉ.बालाजी बिल्लरवार, डॉ.आर.जी.जाधव, डॉ.थोरवट, डॉ.मुक्कनवार आदी डॉक्टर्स उपस्थित होते. या निवडीचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

### अटल युवा फाऊंडेशन बिलोली तालुक्याची कार्यकारिणी जाहीर



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** अटल युवा फाऊंडेशन बिलोली तालुक्याची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून ॲड. उन्मेश कवठाळे यांची तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

सदर निवड ही अटल फाऊंडेशनचे राष्ट्रीय महामंत्री शितल खांडिल यांच्या आदेशानुसार व अटल फाऊंडेशनचे प्रदेशाध्यक्ष गणेश रमेश राजे अटल फाऊंडेशन युवा प्रदेशध्यक्षा डॉ.श्रुती तुडमे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. यासोबतच कुंडलवाडी शहरध्यक्षपदी हनमनलू तडकासाट, तर उपाध्यक्षपदी राजू हुंडेकर, लोकेश भत्ते, गंगाधर दुसलवाड, चिटणीसपदी शशिकांत स्वामी, योगेश गडपवार, हरीदास राम दीनवार, जयराज कंपाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अटल फाऊंडेशन दक्षिण ग्रामीण युवा जिल्हाध्यक्ष गणेश गुरुपवार यांच्या हस्ते यावेळी नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी अनेकांची उपस्थिती होती.

# 'अपरंपार' येथे कायमस्वरूपी पाण्याची सोय

## खा. रवींद्र चव्हाण यांच्या प्रयत्नातून रोहित्र उभारणी



**मुदखेड (प्रतिनिधी)–** खा. रवींद्र चव्हाण यांनी अर्धापूर तालुक्यातील जागृत देवस्थान 'अपरंपार स्वामी मठ' व महादेव मंदिराच्या विहिरीच्या पाण्यासाठी थ्री फेज 'रोहित्र' उभे केल्याने अपरंपार स्वामी मठावरील अनेक वर्षांपासूनचा पाण्याचा प्रश्न सुटला आहे. या निमित्ताने मठाचे स्वामी रेवण सिद्ध गुरु अपरंपारय्या महाराज यांनी खा. रवींद्र चव्हाण यांची भेट घेऊन आभार मानले.

अर्धापूर मुदखेड व हदगाव तालुक्याच्या केंद्रबिंदूवर असणारे घाटमाथ्यावरील 'अपरंपार स्वामी' महाराजांचा मठ व तेथील निसर्गरम्य वातावरणातील महादेव मंदिर नांदेड जिल्ह्यातील लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान आहे. शेकडो वर्षांपासून तेथील मठावर भाविक भक्तांची श्रद्धा आहे. दरवर्षी श्रावण महिन्यात लाखो भाविक भक्त घाट माथ्यावरील अपरंपार स्वामी महाराजांच्या मठात दर्शनासाठी येत असतात. संपूर्ण श्रावण महिन्यात दररोज येणाऱ्या प्रत्येक भाविकांसाठी भोजन प्रसाद असतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची सोय आवश्यक असते. गेल्या अनेक वर्षापासून घाटम ाथ्यावरील रस्ता कठीण असल्यामुळे टँकरने पाणीपुरवठा करणे घातक ठरत होते. त्यानंतर देवस्थानच्या पायथ्याशी नित्यानंद महाराज यांच्या कडून विहीर खोदण्यात आली तर शेंबोली, पांढरवाडी, पाटनूर येथील ग्रामस्थांनी लोकसहभागातून पाईपलाईन उभी केली.

लोकसभा निवडणुकीच्या काळात कै. खा. वसंतराव चव्हाण अपरंपार देवस्थानच्या दर्शनासाठी आले असता त्यांना पाण्याच्या प्रश्नाविषयी रोहित्री उभारणीची अपेक्षा भक्तगणांकडून करण्यात आली होती. हीच बाब लक्षात ठेवून त्यांचे सुपुत्र खा. रवींद्र चव्हाण यांनी कर्तव्यपूर्तीतून कायमस्वरूपी पाणी पुरवठ्यासाठी थ्री फेज 'रोहित्री'ची उभारणी केली आहे. त्यामुळे आता थेट अपरंपार स्वामी मठावर कायमस्वरूपी पाणीपुरवठा सुरु झाला आहे. त्यामुळे अपरंपार मठाला आता टँकर पासून मुक्ती मिळाली आहे.

यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष माजी आ. हनुमंतराव बेटमोगरेकर, कार्याध्यक्ष राजेश पावडे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमंतराव पाटील शेलगावकर, प्रा. संदीपकुमार देशमुख, डॉ. शैलेश पांडागळे, बालाजीराव कल्याणकर आदी उपस्थित होते.

### रामतीर्थ येथे देवाच्या गायीचा शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार



**शंकरनगर (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील मौजे रामतीर्थ येथे देवाच्या गायीचा शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार दि. १३ जुलै रोजी करण्यात आला.

प्रत्येक गावात देवांची गाय म्हणून गौमाता सोडलेली असते, म्हणजे हिंदू धर्मात पवित्र मानल्या जाणाऱ्या गायीला उद्देशून वापरल जाणारा शब्द आहे. देवतांशी संबंधित गायींसाठी हा शब्द वापरला जातो. ही एक पौराणिक गाय आहे. तिच्याकडून कोणतीही इच्छा पूर्ण होऊ शकते, असे मानले जाते. ती सर्व गायींची माता मानली जाते.

हिंदू धर्मात गायीला पवित्र मानले जाते आणि तिची पूजा केली जाते. देवाच्या गायची अत्यंत यात्रा मुख्य रस्त्याने टाळ मृदुंग व ढोल ताशा वाजत नेण्यात आले व आरती करून अंत्यसंस्कार करण्यात आला. यावेळी समस्त गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# समोसा, जिलेबीमुळे लठ्ठपणा अन् कर्करोग

**समोसा, जिलेबी, लाडू हे केवळ आपल्या जेवणाचा भाग नाहीत तर ते आपल्या परंपरेचा देखील एक भाग आहेत. हजारो वर्षांपासून अनेक पदार्थ आपल्या जिभेची चव वाढवत आहेत. पण आता बदलत्या जीवनशैली आणि काळामुळे त्यांचे सेवन हानिकारक होत आहे. भारत सरकारने अशा पदार्थांसाठी सिगारेटसारखे धोकादायक इशारे जारी करण्याचे आदेश दिले आहेत. हे पदार्थ भारतात खूप लोकप्रिय आहेत.**



हे पाऊल भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालय आणि पंतप्रधानांच्या ईट राईट इंडिया उपक्रमांतर्गत उचलले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उद्दिष्ट भारताला स्थूलपणामुक्त करणे आहे. FSSAI ने १४ पदार्थांमध्ये असलेले हानिकारक तेल, साखर आणि कॅलरीजबद्दल माहिती दिली आहे. लोकांना जागरूक करण्यासाठी हे पाऊल उचलले जात आहे. जेणेकरून ते निरोगी राहू शकतील. जे भविष्यात त्यांना तंदुरुस्त ठेवेलच, पण हृदयरोग, मधुमेह आणि कर्करोग इत्यादींचा धोकाही कमी करेल.

## जंक फूड तंबाखूइतकेच धोकादायक

कार्डिओलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया, नागपूर चॅप्टरचे अध्यक्ष अमर आमले यांनी सांगितले की, जंक फूड अन्न लेबलिंग सिगारेटच्या इशाऱ्यांइतकेच गंभीर आहे. अन्नात लपलेले ट्रान्स फॅट आणि साखरेचे प्रमाण तंबाखूसारखे आहे. कोणत्याही प्रकारच्या अन्नावर बंदी नाही. पण जर लोकांना माहीत असेल की एका गुलाबजामुनमध्ये जवळजवळ ५ चमचे साखर असते, तर ते दुसरे गुलाबजाम खाण्यापूर्वी दोनदा विचार करतील.

## ऑइल बोर्डवर ८ पदार्थ

- १ समोसा : प्रति १०० ग्रॅम ३६२ कॅलरीज आणि २८ ग्रॅम फॅट असते.
- १ कचोरी : ४० ग्रॅममध्ये १६६ कॅलरीज आणि १० ग्रॅम फॅट असते.
- १ वडा पाव : १२७ ग्रॅममध्ये २६३ कॅलरीज आणि ९.५ ग्रॅम फॅट असते.
- ६ स्लाइस पिझ्झा : ४७१ ग्रॅममध्ये १३७७ कॅलरीज आणि ४० ग्रॅम फॅट असते.
- केळी चिप्स : प्रति २८ ग्रॅम १४७ कॅलरीज आणि ९.५ ग्रॅम फॅट
- फ्रेंच फ्राईज : ११७ ग्रॅममध्ये ३४२ कॅलरीज आणि १७ ग्रॅम फॅट असते.
- १ बर्गर : २४७ ग्रॅम: ५९० कॅलरीज आणि २०.५ ग्रॅम फॅट

## दिवसात किती खावे ?

FSSAI ने प्रसिद्ध केलेल्या छायाचित्रात चरबी आणि साखरेची दैनंदिन गरज देखील नमूद केली आहे. यानुसार, एक व्यक्ती एका दिवसात २७-३० ग्रॅम चरबी घेऊ शकते. त्याच वेळी, एक प्रौढ व्यक्ती दिवसातून २५ ग्रॅम आणि एक मूल २० ग्रॅम साखर खाऊ शकते. असे चेतावणी फलक वेगवेगळ्या ठिकाणी लावले जातील. हे लवकरच सार्वजनिक ठिकाणे आणि कॅफेटेरियाजवळ दिसतील आणि नागपूरपासून सुरू होतील. २०५० पर्यंत भारत अमेरिकेनंतर सर्वाधिक जादा वजन असलेल्या लोकांचा दुसरा देश बनेल.

## साखरेची पाटी

- १ गुलाबजामून : ६२ ग्रॅममध्ये २०३ कॅलरीज आणि ३२ ग्रॅम साखर असते.
- १ टेबलस्पून गूळ : ५ ग्रॅममध्ये २२ कॅलरीज आणि ४ ग्रॅम साखर असते.
- शीतपेये : प्रति ३०० मिली १३२ कॅलरीज आणि ३२ ग्रॅम साखर असते.
- चवदार रस : प्रति ३०० मिली १७१ कॅलरीज आणि ३६ ग्रॅम साखर असते.
- चॉकलेट : ४५ ग्रॅममध्ये २४० कॅलरीज आणि २५ ग्रॅम साखर असते.
- चॉकलेट पेस्ट्री : ८७ ग्रॅम: २१२ कॅलरीज आणि २० ग्रॅम साखर

लोक पावसाळ्याचा आनंद घेत असताना तुम्ही का आहात निराश ?

# मान्सून ब्लूज

**एकीकडे पावसाळा ऋतू थंड वारा आणि पावसाच्या थेंबांनी दिलासा देतो, तर दुसरीकडे अनेक लोकांसाठी हा ऋतू दुःख, थकवा आणि तणावाचे कारण बनतो. जर तुम्हाला पावसाळ्याच्या दिवसात मूड स्विंग, निद्रानाश किंवा उर्जेचा अभाव जाणवत असेल, तर तुम्हाला मान्सून ब्लूजचा त्रास होत असेल.**

डॉक्टरांच्या मते, मान्सून ब्लूज हा प्रत्यक्षात एक प्रकारचा हंगामी भावनिक विकार (एसएडी) आहे, जो ऋतू बदलाबरोबर होतो. सूर्यप्रकाशाचा अभाव, आर्द्रता आणि तापमानातील चढउतारांमुळे असे होऊ शकते. पण काळजी करण्याची गरज नाही, कारण काही सोप्या सवयी बदलून तुम्ही यापासून मुक्त होऊ शकता. डॉक्टरांच्या मते, झोपेच्या पद्धती, आहार आणि व्यायामात छोटे बदल करून तुम्ही पावसाळ्याच्या काळातील निराशेवर मात करू शकता. या ऋतूतही तुम्हाला ताजेतवाने आणि सकारात्मक ठेवणाऱ्या ५ महत्त्वाच्या टिप्स जाणून घ्या...

## मान्सून ब्लूज म्हणजे काय ?

मान्सून ब्लूज हा एक प्रकारचा भावनिक त्रास आहे जो पावसाळ्यात होतो. त्याची लक्षणे म्हणजे दुःख, चिडचिड, निद्रानाश, भूक न लागणे आणि कमी ऊर्जा पातळी. जर तुम्हाला ही लक्षणे काही आठवडे जाणवत राहिली तर ती नेहमीपेक्षा जास्त गंभीर असू शकते.

## व्हिटॅमिन डी घ्या

पावसाळ्यात सूर्यप्रकाश कमी असतो, ज्यामुळे व्हिटॅमिन डीची कमतरता निर्माण होते. त्यामुळे तुम्हाला थकवा जाणवतो. हे टाळण्यासाठी, सकाळी १५-२० मिनिटे उन्हात बसा आणि अंडी, मासे आणि दूध यासारखे व्हिटॅमिन डी समृद्ध पदार्थ घ्या.

## आहारात या गोष्टींचा समावेश करा

पावसाळ्यात ओमेगा-३ फॅटी ॲसिड (अक्रोड, जवस बियाणे), डार्क चॉकलेट आणि केळी असलेले पदार्थ खा. हे सेरोटोनिन हार्मोन वाढवतात. ज्यामुळे मूड सुधारतो. या हंगामात गरम सूप आणि हर्बल टी हे देखील चांगले पर्याय आहेत.

## व्यायाम अन् योगाने ताण कमी

बाहेर जाऊन चालणे कठीण असेल तर घरी योगा, स्ट्रेचिंग किंवा डान्स करा. प्राणायाम आणि ध्यान हे देखील ताण कमी करण्यास मदत करतात. दररोज फक्त २० मिनिटे व्यायाम केल्याने तुम्हाला ऊर्जा मिळू शकते.

## रात्री लवकर झोपा...

पावसाळ्यात आर्द्रतेमुळे झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. रात्री लवकर झोपण्याची आणि सकाळी लवकर उठण्याची सवय लावा. झोपण्यापूर्वी कोमट दूध किंवा कॅमोमाइल चहा प्यायल्याने चांगली झोप येते.

## समाजात मिसळा, एकटेपणा टाळा

लोक बहुतेकदा त्यांच्या घरातच राहतात, ज्यामुळे एकटेपणा आणि नकारात्मकता वाढते. मित्र आणि कुटुंबियांसोबत व्हिडिओ कॉल करून किंवा इनडोअर गेम खेळून स्वतःला सक्रिय ठेवा.





# थायरॉईडच्या प्रतिबंधासाठी तीन आयुर्वेदिक औषधी वनस्पती

**आजच्या धावपळीच्या जीवनात थायरॉईडची समस्या खूप सामान्य होत चालली आहे. विशेषतः महिलांना या हार्मोनल असंतुलनाचा जास्त त्रास होतो. वजन वाढणे, थकवा येणे, केस गळणे, मूड बदलणे यासारख्या लक्षणांकडे आपण अनेकदा दुर्लक्ष करतो, परंतु ही थायरॉईडची लक्षणे असू शकतात.**

डॉक्टरांच्या मते, जेव्हा शरीरातील थायरॉईड संप्रेरकाचे प्रमाण असंतुलित होते, तेव्हा त्याचा परिणाम आपल्या संपूर्ण चयापचय प्रणालीवर होतो. ॲलोपॅथीमध्ये त्याच्या उपचारासाठी अनेक औषधे उपलब्ध आहेत, परंतु कधीकधी ती दीर्घकाळ घेतल्यास दुष्परिणाम देखील होतात. अशा परिस्थितीत, आयुर्वेदिक उपचार हा एक सुरक्षित आणि प्रभावी पर्याय बनतो. आयुर्वेदात काही औषधी वनस्पती आहेत ज्या थायरॉईड ग्रंथीचे नैसर्गिकरित्या संतुलन राखण्यास मदत करतात. हे केवळ रोग मुळापासून बरा करण्यास मदत करत नाहीत तर शरीराच्या इतर भागांनाही बळकटी देतात. थायरॉईड विरुद्ध एक शक्तिशाली शस्त्र बनू शकणाऱ्या तीन सर्वात प्रभावी आयुर्वेदिक औषधांबद्दल जाणून घेऊया...

## थायरॉईडमध्ये आयुर्वेदिक आहाराचे महत्त्व

केवळ औषधी वनस्पतीच नाही तर योग्य आहार देखील थायरॉईडची स्थिती नियंत्रित करण्यास मदत करतो. आयुर्वेदात थायरॉईड रुग्णांना हलका, सहज पचणारा आणि नैसर्गिक आहार घेण्याचा सल्ला दिला जातो. हिरव्या भाज्या, फळे, काजू आणि हायड्रेटेड राहणे खूप महत्वाचे आहे. तसेच, तुम्ही जास्त तळलेले आणि प्रक्रिया केलेले पदार्थ टाळले पाहिजेत. जेवणात त्रिफळा, हळद आणि मेथी यांसारखे मसाले वापरल्याने थायरॉईडला फायदा होऊ शकतो.

- अश्वगंधा : थायरॉईड संतुलनासाठी नैसर्गिक टॉनिक : अश्वगंधा ही एक अतिशय लोकप्रिय आयुर्वेदिक औषध आहे जी थायरॉईड ग्रंथी सक्रिय ठेवण्यास मदत करते. हायपोथायरॉईडीझमच्या बाबतीत थकवा, नैराश्य आणि हार्मोनल असंतुलन नियंत्रित करण्यासाठी अश्वगंधा प्रभावी आहे. ती शरीरातील कॉर्टिसोलची पातळी कमी करते आणि चयापचय सुधारते. ती दूध किंवा कोमट पाण्यासोबत घेता येते. परंतु त्याचे प्रमाण डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच ठरवावे. थायरॉईडच्या रुग्णांसाठी याचे दीर्घकाळ सेवन फायदेशीर ठरू शकते.
- शतावरी कशी फायदेशीर... : शतावरीमध्ये फायटोएस्ट्रोजेन आणि ॲडाप्टोजेनिक गुणधर्म असतात, जे थायरॉईड ग्रंथीला उत्तेजित करतात आणि T3, T4 संप्रेरकांच्या उत्पादनास प्रोत्साहन देतात. हे विशेषतः हायपोथायरॉईडीझम (थायरॉईडची कमतरता) असलेल्या लोकांसाठी फायदेशीर आहे. शतावरीमध्ये इम्युनोमोड्युलेटरी गुणधर्म असतात, जे रोगप्रतिकारक शक्ती संतुलित



करून ऑटोइम्यून थायरॉईड (हाशिमोटो) समस्या कमी करण्यास मदत करतात.
- ब्राह्मीः मानसिक संतुलनासह हार्मोनल नियंत्रण : ब्राह्मी हे सामान्यतः मेंदूची शक्ती वाढवणारे औषध म्हणून ओळखले जाते, परंतु थायरॉईड नियंत्रित करण्यात त्याचे योगदान देखील खूप महत्वाचे आहे. हे शरीराच्या मज्जासंस्थेला शांत करते आणि थायरॉईडच्या समस्यांचे मुख्य कारण असलेला ताण कमी करते. ब्राह्मी पावडर किंवा सिरपच्या स्वरूपात सेवन करता येते. हे नियमितपणे घेतल्याने मानसिक संतुलन तसेच थायरॉईड नियंत्रणात राहते.



## जीवनशैलीतील बदल

आयुर्वेद हे केवळ औषधांपुरते मर्यादित नाही तर ते जीवनशैलीचे शास्त्र आहे. थायरॉईड नियंत्रित करण्यासाठी नियमित दिनचर्या, प्राणायाम, योगा आणि पुरेशी झोप घेणे खूप महत्वाचे आहे. सूर्यनमस्कार, सिंहासन, भ्रमरी आणि शवासन यांसारख्या योगासनांमुळे थायरॉईड ग्रंथी सक्रिय होते आणि मानसिक ताण कमी होतो. तसेच, स्क्रीन टाइम मर्यादित करणे आणि इलेक्ट्रॉनिक गॅझेट्सपासून दूर राहणे देखील उपयुक्त ठरू शकते.

## डॉक्टरांचा सल्ला महत्त्वाचा...

आयुर्वेदिक औषधे सुरक्षित मानली जात असली तरी, प्रत्येक शरीराचे स्वरूप वेगळे असते. म्हणून, कोणतीही औषधी वनस्पती घेण्यापूर्वी, एखाद्या पात्र आयुर्वेदिक डॉक्टरचा सल्ला नक्कीच घ्या. जर तुम्ही आधीच थायरॉईडची औषधे घेत असाल तर आयुर्वेदिक उपचार सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांच्या देखरेखीखाली ती बदला. योग्य मार्गदर्शनानेच तुम्ही आयुर्वेदाचे जास्तीत जास्त फायदे घेऊ शकता.

# अंधारात झोपा, कर्करोगाला रोखा!

**तुम्हाला माहीत आहे का, की तुमच्या झोपण्याच्या सवयींचा तुमच्या आरोग्यावरही खोलवर परिणाम होतो ? अलीकडील संशोधन असे दर्शविते की जर तुम्ही पूर्ण अंधारात झोपला नाही तर शरीरातील हार्मोनल संतुलन बिघडू शकते. ज्यामुळे कर्करोगासारख्या आजारांचा धोका वाढू शकतो...**



जेव्हा आपण प्रकाशात झोपतो, मग तो रात्रीचा दिवा असो किंवा मोबाईल स्क्रीनचा निळा प्रकाश असो मेलाटोनिन हार्मोनचा स्राव बिघडतो. मेलाटोनिन हे केवळ झोपेसाठी महत्त्वाचे नाही तर आपल्या रोगप्रतिकारक शक्ती आणि पेशी दुरुस्ती प्रणालीमध्ये देखील महत्त्वाची भूमिका बजावते. संशोधनानुसार या संप्रेरकाच्या कमतरतेमुळे शरीरात पेशींचे नुकसान आणि ट्यूमर वाढण्याची शक्यता वाढते. मेलाटोनिन हा एक हार्मोन आहे जो आपल्या मेंदूतील पाइनल ग्रंथीमधून बाहेर पडतो आणि तो शरीराला झोपण्याची वेळ झाल्याचे संकेत देतो. परंतु त्याची भूमिका केवळ झोपेपुरती मर्यादित नाही. तो शरीरात कर्करोगविरोधी गुणधर्मांसाठी देखील ओळखला जातो. जेव्हा तुम्ही पूर्ण अंधारात झोपता तेव्हा मेलाटोनिनचा स्राव जास्त असतो, जो शरीराच्या पेशी दुरुस्ती प्रक्रियेत सुधारणा करतो आणि मुक्त रॅडिकल्सचा प्रभाव कमी करतो. अनेक संशोधनातून असे दिसून आले आहे की मेलाटोनिन स्तन आणि प्रोस्टेट कर्करोगासारख्या आजारांचा धोका कमी करू शकतो.

## प्रकाशात झोपणे धोकादायक

रात्रीच्या वेळी अगदी थोडासा प्रकाशही - मग तो टेबल लॅम्प असो किंवा टीव्हीचा प्रकाश असो, शरीराच्या जैविक घड्याळाला त्रास देऊ शकतो. यामुळे झोपेच्या चक्रात व्यत्यय येतो, मेलाटोनिनची पातळी कमी होते आणि रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. दीर्घकाळ झोपण्याच्या सवयी तुमच्या पेशींच्या वाढीवर नियंत्रण ठेवू शकतात, ज्यामुळे ट्यूमर तयार होण्याचा धोका वाढतो. WHO ने रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणे संभाव्य कार्सिनोजेन म्हणून देखील वर्गीकृत केले आहे, जे ही सवय किती गंभीर असू शकते हे दर्शवते.

## झोपेची गुणवत्ता आणि कर्करोगाचा संबंध

गाढ आणि शांत झोप ही शरीरासाठी एक नैसर्गिक उपचार आहे. ती केवळ शरीराला आराम देतेच असे नाही तर डीएनए दुरुस्ती, हार्मोनल संतुलन आणि रोगप्रतिकारक पेशींना देखील बळकटी देते. जेव्हा तुम्ही पूर्ण अंधारात झोपता तेव्हा झोपेची खोली आणि सातत्य वाढते, ज्यामुळे शरीर स्वतःला चांगले दुरुस्त करण्यास मदत होते. कमी झोप, वारंवार झोपेचा व्यत्यय किंवा प्रकाशात झोपणे यामुळे कर्करोगाशी संबंधित अनेक प्रक्रिया सुरू होऊ शकतात, विशेषतः स्तन आणि कोलन कर्करोगात त्याचा परिणाम दिसून आला आहे.

## कोणते कर्करोग जोडलेले ?

वैज्ञानिक अभ्यासानुसार (संदर्भ) प्रकाशात झोपण्याची सवय प्रामुख्याने स्तनाच्या कर्करोग आणि प्रोस्टेट कर्करोगाच्या प्रकरणांमध्ये दिसून आली आहे. असे आढळून आले आहे की रात्री प्रकाशात झोपण्याची सवय असलेल्या महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचा धोका २०-३०% वाढतो. मेलाटोनिनच्या पातळीत घट झाल्यामुळे शरीराची अँटिऑक्सिडंट क्षमता कमी होते, ज्यामुळे कर्करोगाच्या पेशी वाढू शकतात. हे पुरुषांमध्ये प्रोस्टेट कर्करोगाचे कारण असू शकते.

## बेडरूम अनुकूल कशी बनवायची ?

जर तुम्हाला तुमची झोप मेलाटोनिनने भरलेली हवी असेल आणि तुमच्या शरीराला पूर्ण विश्रांती मिळावी असे वाटत असेल, तर तुमची खोली अंधारी आणि शांत करा. रात्री झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा लॅपटॉप वापरू नका, खिडकीवरील ब्लॅकआउट पडदे लावा आणि रात्रीचा दिवा किंवा एलईडी लाईट बंद ठेवा. तुम्हाला हवे असेल तर झोपताना तुम्ही डोळ्यांवर स्लीप मास्क देखील घालू शकता. या छोट्या सवयी तुमच्या झोपेच्या गुणवत्तेत मोठा फरक करू शकतात आणि कर्करोगासारख्या आजारांपासून तुमचे रक्षण करू शकतात.

## संबंधाबद्दल शास्त्रज्ञ काय म्हणतात ?

मेलाटोनिनचा अभाव आणि रात्रीच्या वेळी प्रकाशाच्या संपर्कामुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो. या अभ्यासात असेही आढळून आले आहे की रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणाऱ्या लोकांमध्ये सामान्य लोकांपेक्षा कर्करोगाचे प्रमाण जास्त असते. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की मेलाटोनिन पेशींना ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून वाचवण्यास मदत करते आणि जेव्हा त्याची पातळी कमी होते तेव्हा हे संरक्षण संपते. म्हणूनच अंधारात झोपणे ही केवळ सवय नाही, तर ती आरोग्याची गरज आहे.

# सीसीटीव्ही प्रकल्पांमध्ये एकसंधता आणण्यासाठी विशिष्ट कार्यप्रणाली- मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** - राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शासन सातत्याने काम करीत आहे. तसेच गुन्हे सिद्धता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानासह सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात येत आहे. राज्यात सीसीटीव्ही प्रकल्पांमध्ये एकसंधता आणण्यासाठी गृह विभागामार्फत विशिष्ट कार्यप्रणाली तयार करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तरेच्या तासावेळी सांगितले.



विधानसभा सदस्य रवी शेठ पाटील यांनी रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील शहरी भागात बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे दुरुस्ती संदर्भात विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रशांत बंब, भास्कर जाधव, प्रशांत ठाकूर, महेश शिंदे आणि श्रीमती श्रीजया चव्हाण यांनी उपप्रश्न विचारून सहभाग घेतला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यात अनेक शहरात व अन्य ठिकाणी पोलीस विभाग, जिल्हा नियोजन समिती तसेच सीएसआर फंडातून आवश्यकतेनुसार बसवण्यात येतात. या सीसीटीव्हींच्या देखभाल दुरुस्ती आणि सनियंत्रणासाठी करण्यात येणाऱ्या कार्यक्रमालेमध्ये सीसीटीव्ही वॉरंटी कालावधी, देखभाल व दुरुस्तीची स्पष्ट जबाबदारी, फायबर कनेक्टिव्हिटीतील अडथळे, तसेच पोलीस विभाग व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांमधील समन्वय यांचा समावेश असेल.

या प्रश्नाच्या उत्तरात गृहराज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर यांनी सांगितले, रत्नागिरी येथील बंद सीसीटीव्ही कॅमेरा संदर्भात रत्नागिरी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून पाठपुरावा करण्यात येत असून या संदर्भात संबंधित कंपनीच्या प्रतिनिधी सोबत बैठक घेण्यात आली आहे. बंद सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करण्याच्या सूचना पोलीस विभागामार्फत देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच रायगड येथील बंद असलेले शेती सीसीटीव्ही कॅमेरे सूरू करणे संदर्भात एक बैठक घेतली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## सुवर्ण मंदिर आणि मंदिरावर बॉम्ब हल्ल्याची धमकी

**अमृसर (प्रतिनिधी)** -पंजाबच्या अमृतसर येथील सुवर्ण मंदिर आणि मंदिरावर बॉम्ब हल्ल्याची धमकी देणारे पत्र पाठवण्यात आले आहे. पाकिस्तानी दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदच्या नावानी लिहीलेले हे धमकीचे पत्र अमृतसर रेल्वे स्टेशनच्या अधीक्षकांना मिळाले आहे. त्यानंतर पोलिसांनी धार्मिक स्थळांभोवती आणि शहरातील सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे. रेल्वे स्टेशनसह इतर सार्वजनिक ठिकाणी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



याबाबत पोलिस आयुक्त सुधांशू शेखर श्रीवास्तव यांच्या आदेशानुसार सुवर्ण मंदिर आणि मंदिराची सुरक्षा कडक करण्यात आली आहे. तिथे जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर लक्ष ठेवले जात आहे. डीसीपी (कायदा आणि सुव्यवस्था) अमरिक सिंग पवार यांनी शहरातील रहिवाशांना पोलिसांना सहकार्य करण्याचे आणि अफवा पसरवणाऱ्यांबद्दल तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे. तब्बल २ पानांचे हे पत्र हिंदी भाषेमध्ये लिहिले आहे.

पत्र लिहिणाऱ्याने स्वतः ला जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा एरिया कमांडर तस्लीम मौलवी असे म्हंटले आहे. तसेच त्याने आपले पत्ता जम्मू-काश्मीर आणि पाकिस्तानचे कराची असा नमूद केला आहे. पत्रात लिहिले आहे की त्यांची संघटना कोणत्याही परिस्थितीत अमरनाथ यात्रा होऊ देणार नाही.

या यात्रेत सहभागी होणाऱ्या कोणत्याही हिंदू किंवा शीख व्यक्तीला जम्मू मध्येच बॉम्बने उडवून दिले जाईल.' पत्रात लिहिले आहे की, 'आम्ही इशारा देत आहोत की कोणीही अमरनाथ यात्रा करू नये. लवकरच जम्मू रेल्वे स्टेशन, पठाणकोट, अमृतसर, फिरोजपूर, जयपूर, जोधपूर आणि बिकानेर रेल्वे स्थानके बॉम्बने उडवून दिली जातील. यासोबतच, अमृतसरचे सुवर्ण मंदिर आणि मंदिर देखील उद्ध्वस्त केले जाईल. लवकरच, जम्मू-काश्मीर आणि पंजाबची भूमी रक्ताने रंगवली जाईल असा इशारा देण्यात आलाय .

### परवानगी पेक्षा जास्तीचे उत्खनन केल्याप्रकरणी दंडात्मक कारवाई- मंत्री बावनकुळे

**मुंबई (प्रतिनिधी )**- परभणी जिल्ह्याच्या पूर्णा तालुक्यातील मौजे गौर येथे मे. मॉन्टो कार्लो कंपनीचे स्टोन क्रशर अवैधरित्या सुरू असल्याचे निदर्शनास आल्याने सदर स्टोन क्रशर बंद करण्यात आले होते. मॉन्टो कार्लो कंपनीने परवानगीशिवाय जास्तीचे उत्खनन केल्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी परभणी यांनी ५ फेब्रुवारी २०२५ अन्वये दंडात्मक नोटीस बजावली असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत सांगितले.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता.

## राज्यात 'हर घर नल' आणि सौर कृषी पंप योजनेला गती- राज्यमंत्री मिसाळ

**मुंबई (प्रतिनिधी )**- 'हर घर नल - नल से जल' योजनेच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचविण्यात येत असून राज्यातील १ कोटी ४६ लाख ७८ हजार ५९० कुटुंबांना घरपोच पाणी देण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधान परिषदेत दिली.

विधानपरिषदेत नियम २६० अंतर्गत मांडण्यात आलेल्या प्रस्तावाला उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ बोलत होत्या.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, आतापर्यंत १ कोटी ३१ लाख ९६ हजार ७५७ कुटुंबांना नळ जोडणी देण्यात आली आहे. यासाठी राज्यात ५ लाख १ हजार ८ योजना राबविल्या जात असून एकूण अंदाजित खर्च ६१ हजार ९३ कोटी रुपये इतका आहे. २०२४ मध्ये राज्यात ४०४१ टँकर लावावे लागले होते, तर २०२५ च्या मे महिन्यात ही संख्या घटून १५६६ झाली आहे. जलजीवन मिशनअंतर्गत ५० टक्के काम पूर्ण झालेल्या गावांमध्ये पाणीपुरवठा सुरू आहे. काही ठिकाणी जागेअभावी, स्थानिकांचा विरोध, विविध परवानग्यांचा विलंब, निधीची कमतरता तसेच कोरड्या पाणीस्रोतामुळे अडचणी आदींमुळे कामांची गती कमी आहे. मात्र, यावर उपाययोजना सुरू असून २,४८३ कोटींचा निधी वितरित करण्यात आला आहे. केंद्र सरकारकडून अतिरिक्त निधीसाठी मागणीही करण्यात आली असल्याचे राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले. राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, मराठवाड्यात ७ जिल्हा प्रयोगशाळा व ३१ उपविभागीय प्रयोगशाळा कार्यरत असून, पाण्याचे नमुने तपासून पिण्यायोग्यता ठरवली जाते. क्षार अधिक असले तर पर्यायी स्रोत उपलब्ध करून दिले जातात. सौर कृषी पंप योजनेत महाराष्ट्र देशात आघाडीवर असून, राज्यात २ लाख ८६ हजार ५५९ सौर कृषी पंप स्थापन झाले आहेत. संपूर्ण देशातील टप्पा ४ लाख ५६ हजार ३४२ आहे. 'मागेल त्याला सौर पंप' या संकल्पनेतून आतापर्यंत ४ लाख ७० हजारांहून अधिक पंप बसवण्यात आले आहेत.


### Change In Name

My Old Name is DINKER ANITA VITHALRAO which now I am changing as New Name ANITA VITTHAL DINKER Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.

SIGN BY-ANITA VITTHAL DINKER,

CURRENT ADD-P.N.41 BHAGYASHRI SOCIETY SHRIRAM CHAUK VASARNI NANDED 431603 MO.9890802038

### Change In Name

My Old Name is BALAJI NARAYAN GARUDKAR which now I am changing as New Name BALAJI NARAYANRAO GARUDKAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.

SIGN BY-BALAJI NARAYANRAO GARUDKAR,

CURRENT ADD-P.N.41 BHAGYASHRI SOCIETY SHRIRAM CHAUK VASARNI NANDED 431603 MO.9421756185

### Change In Name

My Old Name is DINKER VITHALRAO which now I am changing as New Name VITTHAL NARSINGRAO DINKER Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.

SIGN BY-A VITTHAL NARSINGRAO DINKER,

CURRENT ADD-MAHALAXMI NAGAR DASAK JALI ROAD NASHIK 101 NASHIK 422101 MO9975258022

### Change In Name

My Old Name is GARUDKAR SHREYASH BALAJIRAO which now I am changing as New Name SHREYASH BALAJI GARUDKAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.

SIGN BY-HREYASH BALAJI GARUDKAR

CURRENT ADD-P.N.41 BHAGYASHRI SOCIETY SHRIRAM CHAUK VASARNI NANDED 431603 MO.7887966981

### सुवर्णसंधी

नांदेड जिल्ह्यात प्रथमच आपण आपल्या घरातुन, दुकानातुन पार्ट / फुल टाईम साखर(शुगर) चा व्यवसाय करा व दरमहिन्याला १ चांगले इनकम (न फा) मिळवा

**संपर्क**

**रिलायबल ट्रेडर्स गुरूवार बाजार सिडको नांदेड**

**मो.८०८७३१२३४४**

**(दर महिन्याला तुम्ही २० ते ४० हजार पर्यंत मिळवू शकता)**

### टी.सी हरवली

माझी बालाजी हणमंतराव मगर नवीन नांदेड हडको ते विष्णुपुरी ऑटो रिक्षामध्ये प्रवास करतांना दहावी व बारावीची गुणपत्रिका सनंद व टी.सी.हरवलेली आहे ,ज्या कोणास सापडली असेल त्यांनीं संपर्क साधावा

**-संपर्क पत्ता-**

**बालाजी हणमंतराव मगर**

**मोबाईल नंबर.९२०९०९९२८७**

### Change In Name

My Old Name is EKNATH BALAJIRAO KATKAMWAR which now I am changing as New Name EKNATH BALAJI KATKAMWAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.ADD-:113-2 NAGRESHWAR GALLI TQ LOHA NANDED 431708 MO.8668277787

### Change In Name

My old name is SHAIKH RIZWAN AHEMAD hich now I am changing as new name SHAIKH RIZWAN AHEMAD SHAIKH HAMEED Henceforth my all correspondence will be done as per my new name. please consider the same. SING BY SHAIKH RIZWAN AHEMAD SHAIKH HAMEED HIMAYATNAGAR NANDED 431802 MO.9881147614

### टी.सी हरवली

माझी श्रेयस मंगेशकुमार यमलवाड मुदखेड ते नांदेड रेल्वे प्रवासा दरम्यान १२ वी पास विज्ञान शाखेची टि.सी. श्री.शिवाजी ज्युनिअर कॉलेज माणिक नगर नांदेड या नावाची हरवली आहे.

**-संपर्क पत्ता.-**

**श्री.श्रेयस मंगेश कुमार यमलवाड,वाई ता.मुदखेड जि.नांदेड.**




### टी.सी हरवली

माझी मिर्झा अरशद बेग मिर्झा जलील बेग १० वी नापासची टी.सी. पिरबुऱ्हाण ते मालेगाव रोड ऑटोने प्रवास करत असताना हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर साधावा.

**-संपर्क पत्ता-**

**पिरबुऱ्हानगर नांदेड**


### जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर बिलोली यांच्या न्यायालयात,किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९ /२०२५ पु.ता.२५/४/२०२५

अर्जदार-१.पद्मीनीबाई भ्र.गणपत तमनवाड वय-७० वर्षे, व्यवसाय-घरकाम २. मारोती पि.गणपत तमनवाड ,वय-५१ वर्षे,व्यवसाय शेती ३.तानाजी पि.गणपत तमनवाड वय ४८ व्यवसाय शेती ४.शिवाजी पि.गणपत तमनवाड वय ४५ वर्षे व्यवसाय शेती १ ते ४ रा.सिरंजणी ता.हिमायतनगर जि.नांदेड ५.शोभाबाई भ्र.माधव गुंडेवाड वय ५५ वर्षे व्यवसाय घरकाम -रा.इस्लापूर ता.किनवट जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

मुंबई विनिमय कायदा १८२७ नुसार मयत गणपत पि.तानाजी तमनवाड यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार यांना वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला असून अर्जदाराचे असे कथन आहे की, गणपत पि.तानाजी तमनवाड यांचा मृत्यू दिनांक १२/१/२०२३ रोजी मौजे सिरंजणी ता.हिमायतनगर जि.नांदेड येथे मयत आहेत. गणपत पि.तानाजी तमनवाड हे रा.सिरंजणी ता.हिमायतनगर जि.नांदेड येथील रहिवाशी होते.मतयांच्या पश्चात अर्जदार हे सध्या मौजे सिरंजणी ता.हिमायतनगर जि.नांदेड कायदेशीर वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत ३० दिवसात या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि.१२ मार्च, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली**

### जाहीर प्रगटनास आक्षेप

दिनांक ११/०७/२०२५ रोजी दैनिक गोदातिर समाचार वृत्तपत्रात माझा मुलगा नामे ॲड. आसिफ खान पि.अल्ताफ इलाही खान रा.निजाम कॉलनी, श्रीनगर, नांदेड याला मी कसल्याही प्रकारचा अधिकार, माहिती व कागदपत्रे न देता त्याने माझ्या परस्पर व माझे दोन मुले नामे १) इरफान खान पि. अल्ताफ इलाही खान, २) आरिफ खान पि. अल्ताफ इलाही खान यांच्याकडून माझी मालमत्ते संबंधी या दोघांकडून मला शारिरिक व मानसिक त्रास होत असल्याबाबतचा जाहिर प्रगटन सदरील वृत्तपत्रात प्रसिद्ध केले होते, परंतु आजरोजी माझे दोन मुले नामे १) इरफान खान पि.अल्ताफ इलाही खान, २) आरिफ खान पि. अल्ताफ इलाही खान यांच्याकडून मला कुठल्याही प्रकारचा शारिरिक व मानसिक त्रास होत नाही व आमचा कुठलाही कौटुंबिक, मालमत्तेसंबंधी वाद आजरोजी पर्यंत प्रलंबित नाही. तसेच माझा मुलगा नामे - आरिफ खान यांनी स्वतः मला माझ्या नावावर स्वखुशीने General Power of Attorney २६५३/२००२ माझ्या हक्कात करून दिले होते व ते आजरोजी पर्यंत कायम आहे.

तरी सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझा व माझे दोन मूले नामे १) इरफान खान पि.अल्ताफ इलाही खान, २) आरिफ खान पि. अल्ताफ इलाही खान आमच्यात कोणत्याही प्रकारचा वाद नाही याची नोंद घ्यावी व सदरचा आक्षेप गृहित धरण्यात यावा. करीता या जाहिर प्रगटनास आक्षेप. दिनांक :१/४/०७/२०२५

**मार्फत**

**ॲड. अल्ताफ इलाही खान**

**बी.ए., एल.एल.बी.**

**इलाही मंजिल, मंजिल निजाम कॉलनी**

**श्रीनगर नांदेड - ४३१६०५ मो.नं.७७९६८२५७७१**

### जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड

पत्ता:-मस्जिद जुनी ईदगाह, गांधी पुतळयाजवळ, नांदेड-४३१६०१

दुरध्वनी क्र.०२४६२-२९९३३१ ई-मेल: dwonanded@mahawakf.com

संचिका क्र.६९/०३/२०२५/नांदेड क्र. जिव अ/चौकशी/ ६६९/२०२५ दि.: १५/७/२०२५

### (जाहीर प्रगटन)

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजुर

करणेबाबत.

**वक्फ संस्थेचे नाव:- वक्फ संस्था मदिना मस्जिद पत्ता.किवळा ता. लोहा जि.नांदेड**

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार श्री फारुख लालशा पठाण व इतर(४)लोकांनी दि.१५/०७/२०२५ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापणा करिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे.प्रारूप योजनेतील तरतुदी नुसार विश्वस्तांचा कार्यकाळ (०५) वर्षाचा असुन व्यवस्थापण समिती निवडीची रित निवडणुकी व्दारे अशी आहे. योजनेमध्ये नमुद प्रस्तावित समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री.फारूख लालशा पठाण | अध्यक्ष |
| २ | श्री.महेताब नबी शेख | उपाध्यक्ष |
| ३ | श्री.अहेमद बाबु मोमीन | सचिव |
| ४ | श्री.फयाज नजीर पठाण | खजिनदार |
| ५ | श्री.गौस बाबु मोमीन | सदस्य |
| ६ | श्री.मिशकील म.वल्ली पठाण | सदस्य |
| ७ | श्री.शमशोद्दीन गुलाबशहा पठाण | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी ,आक्षेप असल्यास संबंधितांना सदर नोटभस प्रसिद्ध झाल्यापासून (८) दिवसाच्या आत जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय नांदेड पत्ता मस्जिद जुनी ईदगाह नांदेड येथे आपले म्हणणे लेखी स्वरूपात सादर करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(मो.मोतासीम अन्सारी)**

**जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड**

### नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
### ई निविदा सुचना

जा.क्र.नांवाशमनपा/साबांवि/५७५०/२०२५ दिनांक १५/७/२०२५

आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून वरील कामाकरीता ई निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र संकेतस्थळावर https:// mahatender.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकारी आयुक्त मनपा नांदेड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही एकूण १ काम (निविदा अटी शर्ती संकेतस्थळावर ई निविदीची सर्व माहिती उपलब्ध आहे.)सदर निविदा सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.

**अति आयुक्त**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

### महाराष्ट्र शासन
### जलसंपदा विभाग
### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
### नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण)
### चैतन्यनगर, नांदेड- ४३१६०५

ई-मेल:eenidnnd@rediffmail.com PhoneNo.०२४६२-२६०८७१

### जाहीर नोटीस

जाहीर नोटीस देण्यात येते की, अनुकंपाधारक श्री. गोविंद मारोती पवार रा. लोकमित्रनगर, डी- मार्ट रोड, बसवेश्वर पाटीजवळ नांदेड पिन. ४३१६०५ यांना अनुकंपाधारकांच्या जेष्ठता सूचीतील जेष्ठता क्रमानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती प्राधिकारी मा. अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांचे कार्यालयीन आदेश क्र. २०१ पृष्ठांकन क्र./नांपामं/आस्था-२/धा.क्र.१९/१५७८ दि.२८/०३/२०२५ अन्वये शिपाई या पदावर अटी व शर्तींच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. सदरहू आदेश श्री. गोविंद मारोती पवार यांना तामील करुन देण्यात आले आहेत. तथापि आपणास वारंवार कळवून सुध्दा आपण अद्याप पर्यंत उक्त पदावर या कार्यालयात रुजू झालेले नाहीत.

तेव्हा याव्दारे आपणास अंतिमत: सूचित करण्यात येते की, आपण या जाहीर नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून १० (दहा) दिवसांचे आत या कार्यालयात 'शिपाई' पदावर रुजू व्हावे. अन्यथा आपल्या नियुक्ती आदेशातील अट क्र.१६ नुसार आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल. त्यानंतर आपला अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबत कोणताही हक्क राहणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**कार्यकारी अभियंता**

**नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) नांदेड**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गट्टम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




## बाजार समिती कार्यालयात गोंधळ; लिलाव पाडले बंद

**नांदेड (प्रतिनिधी)–** हळदीचे माप झाल्यानंतर १५ दिवसांत शेतकऱ्यांना पैसे देण्याचे ठरले होते. परंतु महिना, दीड महिना खरेदीदार हळदीचे पैसे मिळत नाहीत. त्यामुळे मेटाकुटीस आलेल्या शेतकरी आणि आडत्यांनी १५ जुलै रोजी नवा मोंढातील हळदीचा लिलाव काही वेळ बंद पाडला. यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती, संचालकांना घेराव घालून कार्यालयात ठिय्या मांडला. यापुढे पैसे वेळेवर न मिळाल्यास हळदीचा लिलाव सोमवारपासून बंद पाडण्यात येईल असा इशारा शेतकऱ्यांनी यावेळी दिला.



एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून हळद विक्रीला सुरूवात झाली. हळदीचा हा सिजन येण्याआधी नवा मोंढ्यातील आडत दुकानदार व खरेदीदार यांच्यामध्ये हळदीचे बीट झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या मालाचे वजन १ ते २ दिवसांत करण्याचे ठरले होते. तसेच हळदीचे माप झाल्यानंतर १५ ते २० दिवसांत शेतकऱ्यांना पैसे देण्याचे मान्य करण्यात आले. परंतु हळद खरेदी करणाऱ्यांनी ठरल्याप्रमाणे रक्कम दिली नाही, ती रक्कम २५ ते ३० दिवसांवर जाऊ लागली. आता हळदीचे तेच पैसे मिळण्यास महिना, दीड महिना वाट पाहवी लागत आहे. यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. त्यामुळे आडत्यांनी लिलाव बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. यामुळे ऐनवेळी शेतकऱ्यांची हळद बीटात आल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. तेव्हा संतप्त शेतकऱ्यांनी पैसे वेळेवर पाहिजे म्हणत सभापतीच्या दालनाकडे मोर्चा वळवला. सभापती संजय देशमुख लहानकर, संचालक तथा शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, निलेश देशमुख, ज्ञानेश्वर राजेगोरे, गजानन कदम यांच्यासमोर संतप्त शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधींना धारेवर धरून काही वेळ कार्यालयात ठिय्या मांडला. यावेळी सभापती लहानकर यांनी यापुढे शेतकऱ्यांना वेळेवर पैसे देण्यासाठी भाग पाडू असे आश्वासन दिल्यानंतर शेतकरी शांत झाले. यावेळी मोंढ्यात होणारी आडत्याची व शेतकऱ्यांच्या पिळवणुकीविषयी आवाज नवनाथ दर्यापूरकर, शिवाजी वासरीकर, राजू सावकार पालदेवार, विठ्ठल देशमुख, गणेशराव वासरीकर, राम राजेगोरे, संतोष कदम, दीपक शिंदे, बंटी शिदे यांनी उठवला.

## लोहा पालिकेवर काँग्रेस पक्षाचा धडकला मोर्चा

**लोहा (प्रतिनिधी)–** शहरातील नागरिकांना स्वच्छता, साफसफाई पाणी पुरवठा घरकुल योजनेसह इतर मूलभूत सोयीसुविधा देण्यात याव्यात यासह अन्य मागण्यांसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा मोर्चा मंगळवारी लोहा पालिकेवर धडकला. मोर्चात हजारोंची उपस्थिती होती. मोर्चातील महिलांचा लक्षणीय सहभाग सर्वाचे लक्ष वेधून घेत होता.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने लोहा पालिकेवर मोर्चा काढण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला होता. पालिकेकडून मोर्चा काढण्यात येऊ नये अशी विनंती काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्यांना केली होती. सोमवारी मुख्याधिकारी यांच्या दालनात काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांसोबत चर्चाही झाली. मात्र बैठक निष्फळ झाल्याने मंगळवारी काँग्रेस पक्षाचा हजारोंचा मोर्चा पालिकेवर काढण्यात आला. प्रारंभी जुना लोहा येथील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मोर्चास सुरुवात करण्यात आली. मोर्चाचे नेतृत्व काँग्रेस पक्षाचे लोहा-कंधार विधानसभा प्रभारी एकनाथ मोरे, माजी उपनगराध्यक्ष सोनू संगेवार, कंधारचे तालुकाध्यक्ष माजी जि. प. सदस्य संजय भोसीकर, लोहा तालुकाध्यक्ष मधुकर पाटील दिघे, शहराध्यक्ष माजी नगरसेवक वसंत पवार, प्रदेश कार्यकारिणी सदस्य माजी जि. प. सदस्य श्रीनिवास मोरे, माजी जि. प. सभापती संजय पाटील कऱ्हाळे, गणेश घोरबांड, शिवाजी आंबेकर, माजी नगरसेवक चंद्रकांत नळगे, सरपंच बाबासाहेब बाबर यांनी केले.




लोहा शहरवासीयांना मूलभूत सोयीसुविधा पुरविण्यास पालिका अपयशी ठरली असा आरोप करून शहरातील नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, शहरात स्वच्छता, पाणी पुरवठा, दिवाबत्ती, नागरिकांच्या घरकुलाचा प्रश्न मार्गी लावून लाभार्थ्यांना तत्काळ घरकुल योजनेचे हप्ते वितरीत करावे, उघड्यावरील व वस्तीतील मांसाहारी खानावळी बंद कराव्यात, गुंठेवारी प्रकरणाची चौकशी करण्यात यावी यासह इतर प्रमुख मागण्यांचे निवेदन पालिकेचे मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांना काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने दिले. सदरील मोर्चात पालिकेचे माजी नगरसेवक उत्तम महाबळे, शहर उपाध्यक्ष श्याम पाटील नळगे, युवा नेते विक्रांत नळगे, गजानन कळसकर, अमोल महामुने, संजय पवार, सत्तार शेख, राजेश ताटे, छत्रपती कदम, कृष्णा दाभाडे, विनोद लोढा, लक्ष्मण गायकवाड, विनोद पांचाळ, पुरभा सावळे, संभाजी सावळे यांच्यासह बहुसंख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

इंदिरा नगर भागातील महिलांनी मोर्चा दरम्यान माजी उपनगराध्यक्ष सोनू संगेवार यांना परिसरातील समस्यांचा आणि घरकुल हप्ता त्वरित देण्यासाठी विशेष लक्ष घालावे तसेच परिसरातील समस्येचे निराकरण करण्यासाठी पुढाकार घेण्याची विनंती केली.




**नांदेड –**ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक कै. नरहर कुरूंदकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी खा. प्रा. रविंद्र चव्हाण, माजी महापौर जयश्री पावडे, डॉ. रेखाताई पाटील, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, अब्दुल गफार, राजेश पावडे, विठ्ठल पावडे, महेश देशमुख, बालाजी चव्हाण, अजिज कुरेशी, महेश मगर, पिंटू पाटील, नागराज सुजलेकर, संजय शर्मा, गणेश कोकाटे आदी दिसत आहेत. (छाया–करणसिंह बैस)

## नागनाथ घिसेवाड व बंटी लांडगे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**नांदेड (प्रतिनिधी) –** भोकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भोकर नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष नागनाथराव घिसेवाड व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरद पवार गट) उपाध्यक्ष आनंद (बंटी) लांडगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस(अजितदादा पवार गट) मध्ये प्रवेश केला. यावेळी अर्धापूर भोकर व नांदेड शहरातील अनेक कार्यकर्त्यांनी मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्ष कार्यालय येथे पक्षप्रवेश केला.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे व लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची उपस्थिती होती.



यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आ. शिवाजीराव गर्जे, आ. विक्रम काळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, माजी आ. मोहनराव हंबर्डे, माजी आ. अविनाशराव घाटे, आनंद परांजपे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस दिलीपराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष माधव पावडे, शेषराव चव्हाण आदींची उपस्थिती होती.

या पक्षप्रवेशामध्ये भोकर तालुक्यातील यशवंत सेना मराठवाडा अध्यक्ष ओबीसी नेते नागोराव शेंडगे बापू, डौरचे माजी सरपंच गणेशराव जाधव, माजी कृउबास भोकरचे उपसभापती शिवाजी पांचाळ, भोकर कृउबा समितीचे संचालक अप्पाराव राठोड, बोरगावचे माजी सरपंच गितेश बोटलेवाड, माधव सूर्यवंशी, संतोष गागदे, रामराव कोंगेवाड, आनंदराव दासरवाड, बाबुराव राठोड, अवधुत इळेगावकर, चंपतराव मेंडके, गजानन साखरे, रामजी कुरुकवाड, नारायण जिल्लेवाड, संदीप मालेगावकर, राजू येदले, दत्ता बोईनवाड, देवराव पाशेमवाड, अनिल डोईफोडे, उल्लप्पा हुलगुंडे, व्यंकटराव मांजरे पाटील, गोविंद राऊतवाड, कल्याण कऱ्हाळे, सर्जेराव शिंदे, विलास कल्याणकर, महेश राजेगोरे, जगन्न कल्याणकर, ज्ञानेश्वर जाधव, मारोतराव कपाटे, बालाजी कल्याणकर, माधव राजेगोरे, शिवाजी कल्याणकर, गजानन कल्याणकर यांच्यासह अनेकांनी पक्षप्रवेश केला.

## घर फोडून पावणे दोन लाखांचा ऐवज लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)–** घरी कोणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने पद्मजा सिटीतील एका घरातून १ लाख ७५ हजार रुपयांचा सोन्या- चांदीच्या दागिन्यांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

नोकरदार अपूर्व अंबाप्रसाद वशिष्ठ यांच्या भाऊजीचे घर पद्मजा सिटी येथे आहे. १० ते १४ जुलै दरम्यान त्यांचे भाऊजी व बहीण बाहेर गावी कामानिमित्त गेले होते. घरी कोणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यांच्या कपाटाच्या लॉकरमधील रोख १ लाख रुपये व सोन्याचे दागिने ७५ हजार असा एकूण १ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

## सराईत गुन्हेगार सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहर व परिसरात सतत दहशत पसरविणाऱ्या आरोपीला अटक करून सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. ही कारवाई नांदेड ग्रामीण पोलिसांनी केली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत पोलीस स्टेशन हद्दीत वारंवार गुन्हे करणाऱ्या इसमावर हद्दपार प्रस्ताव सादर करावे असे सर्व पो. स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने पो. स्टे. नांदेड ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांचे मार्गदर्शनाखाली वरील नमूद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पो.स्टे. नांदेड ग्रामीण हद्दीत व इतरत्र वारंवार गुन्हे करुन दहशत माजविणारा सिध्देश्वर एकनाथ काळे (वय २४, रा. रविनगर कौठा, नांदेड) याचे विरुद्ध कलम ५६ (१) (ब) महाराष्ट्र पोलीस अधिनियमप्रमाणे हद्दपार प्रस्ताव बनवून पोलीस अधीक्षक यांच्या मार्फतीने उपविभागीय दंडाधिकारी यांना सादर केला होता.

उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड यांनी आदेश क्र.२०२४/हद्दपार/एमएजी/सीआर-६७ ३ जुलै अन्वये सदर इसमास सहा महिण्यांसाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार केले होते. बुधवार दि. १५ जुलै रोजी पो.स्टे. नांदेड ग्रामीण हद्दीत सदरचा इसम आल्याची माहिती मिळाल्याने त्यास ताब्यात घेऊन हद्दपार आदेश त्यास देवुन नांदेड जिल्ह्याचे हद्दीतून निघुन जाण्यास सांगितले आहे.

## धनगर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा नांदेड येथे २० रोजी सत्कार सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी) –** धनगर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा रविवार, दि. २० जुलै रोजी सकाळी ११ वाजता कुसुम सभागृह येथे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन धनगर समाज गुणवंत विद्यार्थी सत्कार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. शिवाजीराव हाके हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे कामगार आयुक्त मंगेश झोले, नांदेडचे माध्यमिक शिक्षणाधिकारी माधवराव सलगर, पत्रकार सुभाष बोंद्रे, अ‍ॅड. सहाय्यक सरकारी अभियोक्ता अभय शिकरे, प्रा. महादेव बनसुडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या सत्कार सोहळ्यात १० वी व १२ वी वर्गात ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त करणारे विद्यार्थी, NEET परीक्षेत ४०० हून अधिक गुण मिळवणारे, JEE परीक्षेत ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे, नवोदय प्रवेश परीक्षेत यशस्वी विद्यार्थी, तसेच पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत आणि विविध स्पर्धा परीक्षांमध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

तेव्हा नांदेड जिल्ह्यातील धनगर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी आपली नावे १८ जुलैपर्यंत ९८२२२५५०६४, ८८८८८६५८८३, ९३२५६९८९१५ या मोबाईल नंबरवर नोंदणी करावी, यासाठी योग्य शैक्षणिक कागदपत्रांची प्रत जोडणे आवश्यक आहे. धनगर समाजातील जास्तीत-जास्त बंधू-भगिनींनी उपस्थित राहून आपल्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन धनगर समाज गुणवंत विद्यार्थी सत्कार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## खरबी येथे शेतकऱ्याची विष पिऊन आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यातील खरबी येथे सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून एका शेतकऱ्याने विष पिऊन आत्महत्या केली. ही घटना १४ जुलै रोजी सकाळी घडली.

हदगाव तालुक्यातील खरबी येथील चांदू शिवाजी खांदोडे (वय ३०) यांच्या शेतात मागील काही वर्षापासून सततची नापिकी होत होती. त्यामुळे ते कर्जबाजारी झाले. त्या कर्जाची परतफेड होत नसल्याने अखेर हतबल झालेल्या चांदू शिवाजी खांदोडे या शेतकऱ्याने आपल्याच शेतात जाऊन विष पिऊन आत्महत्या केली. ही माहिती बाबुराव पवार यांनी मनाठा पोलीस ठाण्यात दिल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक इंगोले करत आहेत.




**नांदेड –**सचखंड गुरुद्वारा बोर्ड अ‍ॅक्ट १९५६ कलम ११ चे संशोधन रद्द करण्यासाठी मंगळवार पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर समूह हजुरी तथा साथ संगत श्री हजुर साहेब नांदेडच्यावतीने बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहे. यावेळी मनिंदरसिंघ रामगडीया, मनबीरसिंघ ग्रंथी, गुरमितसिंघ बेदी, विरेंद्रसिंघ बेदी, तेजपालसिंघ खेड, माजी सचिव रविंद्रसिंघ बुंगई, माजी सचिव भागिंदरसिंघ घडीसाज, माजी सदस्य मनप्रीतसिंघ बुंगई, बक्षीसिंघ पुजारी, दीपकसिंघ इजुरिया, जगदिपसिंघ नंबरदार, विक्कीसिंघ हंडी, मनजितसिंघ प्रधान, मोहनसिंघ गाडीवाले, दीपकसिंघ गल्लीवाले, बादलसिंघ महाजन, बेरेंद्रसिंघ बेदी यांच्यासह आदींची उपस्थिती होती. (छाया–ज्ञानेश्वर सुनेगावकर)

## युवकांनी कौशल्यावर आधारित उद्योजकतेच्या संधीचा लाभ घ्यावा – कुलगुरू डॉ. चासकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** युवकांनी स्वतःवर विश्वास ठेवत नवकल्पना आणि कौशल्यावर आधारित उद्योजकतेच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.

जागतिक युवक कौशल्य दिन-२०२५ जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांच्यावतीने आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. चासकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले होते.



कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे विचार मांडले. त्यांनी कौशल्य हे केवळ नोकरी मिळवण्यासाठी नाही तर नव्या संधी निर्माण करण्याचे माध्यम असल्याचे स्पष्ट केले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी उपस्थित युवकांना कौशल्याचे महत्त्व समजावून सांगून रोजगाराच्या नव्या संधी शोधण्यासाठी प्रेरित केले.

यावेळी विविध शासकीय योजनांचे सादरीकरण करण्यात आले. स्थानिक यशस्वी उद्योजकांनी मार्गदर्शन सत्रात त्यांच्या उद्योग प्रवासाची माहिती देत युवकांमध्ये प्रेरणा जागवली. यात निळंकठ कोंकणे- एलईडी लाइट्स मॅन्युफॅक्चरिंग नर्सी, शिवहार कुरुंके- मिनरल वॉटर बॉटल्स उत्पादन, श्रीमती सविता मोरे- सुगंधी तेल निर्मिती, मोहम्मद जेद-कोल्डड्रिंक्स नांदेड, एकवंत गवदवार-मसाला उद्योग नांदेड, श्रीमती देवकीनंदा-खादी उत्पादन, शुभम पवार-कोकम सॉफ्ट ड्रिंक या उद्योजकांचा समावेश होता.

## खंजर दाखवून लूटमार करणाऱ्या तिघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोटाची खळगी भरण्यासाठी उत्तर प्रदेशातून आलेल्या एकाला खंजरचा धाक दाखवून त्याच्याकडील व त्याच्या मित्राच्या फोन पेवरून आपल्या खात्यात पैसे जबरीने काढून घेणाऱ्या तिघांना भाग्यनगर पोलिसांनी अटक केली.

शनिवार, दि. १२ जुलै रोजी धनराज छेदीलाल यादव (वय-२७, रा. छेदीलाल गंभरी फतेपूर राज्य उत्तप्रदेश ह. मु. राजकॉर्नर नांदेड) हा त्याचा मित्र व भाऊ यांच्यासोबत जेवण करून रात्री ११.३० वाजताच्या सुमारास पल्स हॉस्पीटल समोर, सहयोगनगर नांदेड येथे फिरत होते. यावेळी त्यांच्याजवळ तीन अनोळखी तरुण ॲक्टीव्हा स्कुटीवर येऊन त्यांना आडवून, खंजरने डाव्या हातावर वार करून त्यांच्याकडील नगदी दीड हजार व त्याच्या फोन पे वरून आरोपींच्या क्यूआर कोडवर ११२ रुपये व फिर्यादीचा मित्र मुकेश कुमार विशाल पासवान याच्या फोन पे वरुन ५०० रुपये असे २ हजार ११२ रुपये जबरदस्ती काढून घेतले. त्याच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक वाडेवाले यांना मिळताच त्यांनी त्यांच्या पथकासह आरोपींचा शोध घेऊन तिन्ही आरोपींना शोधून त्यांच्याकडुन गुन्ह्यात जबरदस्तीने घेतलेले २ हजार ११२ रुपये तसेच गुन्ह्यात वापरलेला खंजर व ॲक्टीव्हा स्कुटी जप्त करुन तात्काळ गुन्हा उघडकीस आणला.

या गुन्ह्यातील मुद्देमाल १०० टक्के हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात १६ जुलैचे सकाळी ६ वाजेपासून ते ३० जुलै २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १६ जुलैचे सकाळी ६ वाजेपासून ते ३० जुलै २०२५ मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमूद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.







**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com